cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

गणपती बाप्पा मोरया

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१४४ | शनिवार दि.१४ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# अखेर सोयाबीन–कापूस अनुदान वाटपाला मंजूरी

## १ हजार ५९३ कोटीची तरतूद, शासन निर्णय निघाला

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने कापूस सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी अखेर १ हजार ५९३ कोटी रुपये निधी वाटपाला मंजूरी दिली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी (दि.१३) रोजी प्रसिद्ध करण्यात आला. यापूर्वी अर्थ विभागाने पहिल्याच टप्प्यात ६० टक्के म्हणजेच २ हजार ५१६ कोटी इतक्या निधीच्या वितरणास ३ सप्टेंबर रोजी मान्यता दिली होती. त्यापैकी उर्वरित १ हजार ५९३ कोटी रुपये निधी शुक्रवारी वाटपाला मंजूरी दिली आहे. याबाबतच आदेश निघत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.**

२०२३ च्या खरीप हंगामात सोयाबीन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हमीभावाच्या खाली सोयाबीन कापूस विकावे लागले होते. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रुपये तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी प्रति हेक्टर ५ हजार रुपये दोन हेक्टरच्या मर्यादित देण्याकभा निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी राज्य सरकारने ४ हजार १९४ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता दिलेली आहे.



### शेतकरी अनुदानाच्या प्रतिक्षेत

दरम्यान, १० सप्टेंबरपासून अनुदान पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचे निर्देश कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी कृषी विभागाला दिले होते. परंतु १० सप्टेंबरचा मुहूर्त टळला तरीदेखील अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.

सोयाबीन – कापूस अनुदानासाठी एकूण ४ हजार १९४ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये १ हजार ५८४ कोटी रुपये कापूस उत्पादकांसाठी तर २ हजार ६४६ कोटी सोयाबीन उत्पादकांसाठी देण्यात येणार आहेत. महसूल विभागाने कृषी विभागाला ई पीक पाहणी नोंद झालेल्या सोयाबीन कापूस उत्पादकांची यादी दिलेली आहे. परंतु आता त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांच्या सातबारावर सोयाबीन कापूस नोंद नाही, अशा शेतकऱ्यांनाही अनुदानासाठी पात्र ठरवण्यात येणार आहे. त्यासाठी महसूल विभागाने शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्यास सुरूवात केली आहे. जसजसे या अनुदानाला शेतकरी पात्र ठरतील. तसतसा निधी टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात येणार आहे. राज्य सरकारने एकूण अनुदान निधी जमा केल्यामुळे शेतकऱ्यांचा अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



## १९ सप्टेंबर पासून पावसाचा परतीचा प्रवास सुरू

**दिल्ली । वृतसंस्था**

**नैऋत्य मान्सूनच्या परतीचा प्रवास लवकरच सुरू होणार आहे. १९ सप्टेंबर पासून मान्सून देशातून माघार घेईल, असे भारतीय हवामान खात्याने सांगितले आहे.**

सामान्यतः नैऋत्य मान्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होतो आणि ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो. तो १७ सप्टेंबरच्या सुमारास वायव्य भारतातून परतीचा प्रवास सुरू करतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत भारतातून पूर्णपणे माघारी फिरतो. परंतु यंदा ''आठवड्याच्या उत्तरार्धात (सप्टेंबर १९–२५) नैऋत्य मान्सून वायव्य भारतातील काही भागांतून माघार घेण्यासाठी परिस्थिती अनुकूल होण्याची शक्यता आहे,'' असेही आयएमडीने म्हटले आहे. १ जूनपासून, चार महिन्यांचा मान्सून हंगामात देशात ८३६.७ मिमी पाऊस पडतो दरम्यान यंदा तो सामान्य ७७२.५ मिमी पावसापेक्षा आठ टक्के जास्त आहे. ◀◀ पान २ वर

# बलाढ्य असलेल्या भाजपला बीड जिल्ह्यात उतरती कळा

## नेतृत्वाचे दुर्लक्ष; उमेदवारी मिळणार नसल्याने अर्धे नेते पक्ष सोडणार?





**बीड । प्रतिनिधी**

**स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यकाळापासून गेल्या ५ वर्षापर्यंत बीड जिल्ह्यावर भाजपने आपले वर्चस्व कायम ठेवले होते. सध्याची परिस्थिती पाहता बीड जिल्ह्यात भाजपला उतरती कळा येत आहे. पक्ष नेतृत्वाचे दुर्लक्ष असल्याने पदाधिकारी आणि कार्यकर्ते सुध्दा पर्याय शोधण्याच्या तयारीत असल्याचे समजते. अर्धे नेते हे विधानसभेची उमेदवारी मिळणार नसल्याने तर काही नेते पक्षांतर्गत कलहामुळे पक्ष सोडणार असल्याचे बोलले जात आहे. तसे झाले तर भाजपच्या नेत्या आ. पंकजा मुंडे यांच्यासाठी ही धोक्याची घंटा असेल. गेल्या पाच वर्षापासून खऱ्या अर्थाने त्यांचे बीड जिल्ह्याकडे दुर्लक्ष असल्याचा हा परिणाम असल्याचे म्हटले जात आहे.**

बीड जिल्ह्यात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद समसमान आहे. विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्षांच्या जागा ◀◀ पान २ वर

### माजलगावात दोन नेते साथ सोडणार?

माजलगाव विधान सभा मतदार संघ हा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला सोडला जाण्याची शक्यता असून भाजपचे रमेश आडसकर आणि मोहन जगताप यांनी विधानसभा निवडणुक लढवण्याचा चंग बांधला आहे.





उमेदवारी मिळाली नाही तर दुसरा पर्याय शोधण्याचे संकेत या दोन्ही नेत्यांनी अगोदरच दिले आहेत. हे दोन नेते भाजप सोडून गेले तर माजलगाव मतदारसंघात पक्षाकडे सक्षम असा चेहराच नाही.

### आष्टीत धस, धोंडे वेगळा निर्णय घेणार

आष्टी मतदार संघात भाजपची मोठी ताकद आहे. मात्र हा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडे जाण्याची शक्यता असल्याने सुरेश धस आणि भीमराव धोंडे यांनी अप्रत्यक्षपणे वेगळा निर्णय घेण्याचे संकेत दिले आहेत. तसे झाले तर आष्टीत भाजप हा तिसऱ्या स्थानी फेकला जाण्याची दाट शक्यता आहे.





### गेवराईत आ. लक्ष्मण पवार यांची नाराजी



आ. लक्ष्मण पवार यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर नाराजी व्यक्त करीत पवार कुटुंब आमदारकीची निवडणुक लढवणार नसल्याचे सांगून भाजप नेतृत्वाची डोकेदुखी वाढवली आहे. आ. पंकजा मुंडे आणि आ. लक्ष्मण पवार यांच्यात गेल्या काही वर्षापासून नाराजीनाट्य सुरु होते. त्याचाही फटका काही प्रमाणात का होईना कार्यकर्त्यांना बसला आहे.

## अदानी प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयानेच नियंत्रणात घ्यावे

### जयराम रमेश यांचा केंद्र सरकारवर हल्लाबोल

**दिल्ली । वृतसंस्था**

काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी स्वित्झर्लंडमधील अदानी समूहाच्या सहयोगींची पाच खाती गोठवल्याप्रकरणी केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. अदानी प्रकरण आपल्या नियंत्रणाखाली घ्यावे, अशी विनंतीही त्यांनी सर्वोच्च न्यायालयाला केली आहे. तसेच, त्याच्या संपूर्ण व्याप्तीची चौकशी करण्यासाठी तातडीने



जेपीसी बोलावण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच काँग्रेस नेत्याने पंतप्रधान मोदींवरही निशाणा साधला. ते म्हणाले की, हे स्पष्ट आहे की पंतप्रधान आपल्या मित्राच्या समृद्धीसाठी आणि संरक्षणासाठी कटिबद्ध आहेत. स्वित्झर्लंड, श्रीलंका आणि बांगलादेशात भारताच्या प्रतिष्ठेला तडा गेल्याची त्यांना पर्वा नाही.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी हिंडेनबर्ग रिसर्चच्या ताज्या अहवालावरून अदानी समूहावर जोरदार निशाणा साधला आहे. तसेच याबद्दल संयुक्त संसदीय कमिटीची (जेपीसी) ◀◀ पान २ वर

## मंकीपॉक्स विरोधी लसीला जागतिक आरोग्य संघटनेची मंजुरी

**दिल्ली । वृतसंस्था**

**जगभरात एमपॉक्स (मंकीपॉक्स) या आजाराचे रुग्ण वाढत असताना जागतिक आरोग्य संघटनेने या आजाराविरुद्ध लसीला मंजुरी दिलेली आहे. ही लस प्रौढांसाठी असेल. या आजाराविरोधातील लढ्यात हे महत्त्वाचे पाऊल आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे.**




पात्रतापूर्व मंजुरी असे याचे स्वरूप आहे, तसेच या लसीची निर्मिती नॉर्डीक या कंपनीने केलेली आहे. पात्रतापूर्व याचा अर्थ युनिसेफ, व्हॅक्सिन अलायन्स अशा संस्था ही लस विकत घेऊ शकतात. पण या लसीची निर्मिती करणारी एकच कंपनी असल्याने या लसीचा पुरवठा मर्यादित असणार आहे. जागितक आरोग्य संघटनेचे सरसंचालक टेड्रॉस घेब्रेयेसुस यांनी ही माहिती दिली. ◀◀ पान २ वर

## देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातला सर्वात भित्रा प्राणी

### • मनोज जरांगे पाटील यांची बोचरी टीका

**अंमळनेर । प्रतिनिधी**

देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात आमदार उभे केले आहेत. ही त्यांची चाल आहे. मराठा का संपवायला निघाला आहात काय? १०६ आमदार मराठ्यांनी निवडून दिले आहेत. आम्ही आमचे आरक्षण मागत आहोत. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातला सर्वात भित्रा प्राणी आहे, अशी बोचरी टीका मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्यावर केली आहे. शिरूर मतदार संघातील पिंपळवंडी येथील घोंगडी बैठकीतून ते बोलत होते.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्यांना आरक्षण मिळू द्यायचे नाही ही सर्वांची इच्छा आहे. हा समाज बलाढ्य आहे. समाज प्रगत होईल म्हणून आरक्षण मिळू द्यायचे नाही. अनेक जणांनी देव पाण्यात ठेवले आहेत. राजकीय पक्षातील लोक आपल्यात फूट पाडत आहेत. फूट पडण्यासाठी सरकारने आंदोलन उभे केले असल्याची टीका त्यांनी केली. ते पुढे म्हणाले की, निवडणुका जवळ आल्या आहेत. त्यामुळे भावनिक केले जाणार आहे. प्रत्येक ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१३ सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.५० क्विंटल | १,९०० | २,६७६ | २,४४५ |
| ज्वारी/हायब्रिड : १७९.५० क्विंटल | ४,२०१ | ७,२७१ | ६,२२१ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ९०.५० क्विंटल | ४,६०० | ७,१०१ | ६,४१६ |
| बाजरी : ४६.०० क्विंटल | २,०२१ | २,६७१ | २,४५९ |
| मुग : ३६.५० क्विंटल | ५,९०० | ७,८०० | ७,३९३ |
| सोयाबीन: ६४.०० क्विंटल | ३,२०० | ४,५५० | ४,०९७ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ७,३०१ | ७,३०१ | ७,३०१ |

## राहुल गांधींना धमकावल्याबद्दल भाजप नेत्यावर कारवाई करा–काँग्रेसची मागणी

दिल्ली। वृतसंस्था

राहुल गांधींना इंदिरा गांधी यांच्या प्रमाणेच मारण्याची धमकी दिल्याबद्दल भाजप नेते तरविंदर सिंग मारवाह यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी काँग्रेसने केली आहे. तसेच मारवाह भाजप नेतृत्वाकडून असे वक्तव्य करत आहेत का, ◀◀ पान २ वर



## विभाजन करणाऱ्या देशविरोधी शक्तींविरुद्ध लढत राहीन!

### तुरुंगातून बाहेर येताच अरविंद केजरीवाल यांचा सरकारवर हल्लाबोल

**दिल्ली । वृतसंस्था**

तुरुंगातून बाहेर आल्यानंतर १०० पटीने मनोबल वाढले आहे. देशाचे विभाजन करून कमकुवत करण्याचे काम करणाऱ्या सर्व देशविरोधी शक्तींविरुद्ध मी लढत राहीन. मला करोडो लोकांचे आभार मानायचे आहेत. लाखो लोकांनी शुभेच्छा दिल्या, आशीर्वाद दिले. मंदिरात गेलो, मशिदीत गेलो, गुरुद्वारात गेलो. मी सर्वांचे आभार मानतो. पावसात इतक्या मोठ्या संख्येने आल्याबद्दल मला सर्वांचे आभार मानायचे आहेत, असे अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल शुक्रवारी (१३ सप्टेंबर) तिहार तुरुंगातून बाहेर ◀◀ पान २ वर

# मराठवाड्यात २५ मराठा आमदार पाडणार!

## लक्ष्मण हाके कडाडले, जरांगे पाटलांच्या बाजुलाच उपोषण करण्याचा दिला इशारा

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत मध्यरात्री १२ वाजल्यापासून मनोज जरांगे पाटील उपोषण सुरू करणार आहेत. तर दुसरीकडे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनीही उपोषणाची घोषणा केली आहे. ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन पुन्हा एकदा सुरू करण्यात येईल असे लक्ष्मण हाके यांनी सांगितले आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे फक्त मराठा जातीचे मुख्यमंत्री आहेत, त्यांना या निवडणुकीत ओबीसीची ताकद दिसेल, असे सांगत लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगेंचे उपोषण सुरू होताच, आपणही उपोषण सुरू करणार असल्याचे म्हटले आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील ज्या ठिकाणी उपोषणाला बसतील, त्याच्या दुसऱ्या दिवशी, त्याच ठिकाणी ओबीसीचे उपोषण सुरू झालेले दिसेल असे लक्ष्मण हाके म्हणाले. मनोज जरांगे यांना त्यांच्याच भाषेत आणि त्यांच्याच ताकदीने ओबीसी देखील उत्तर देतील. नुसत्या मराठवाड्यात २५ आमदार ओबीसींकडून पाडण्यात येणार आहेत. आमच्याकडे त्या २५ आमदारांची यादीही तयार आहे. त्यामुळेच आता काही आमदार निवडणूक न लढवण्याच्या भूमिकेत उतरू लागले, असा गौप्यस्फोटही लक्ष्मण हाके यांनी केला आहे. या विधानसभेला शरद पवार, एकनाथ शिंदे, काँग्रेस यांना ओबीसी मोठा दणका देणार आहेत. जे नेते मनोज जरांगे यांना भेटलेत, त्यांची यादी आमच्याकडे असून त्या सर्व आमदारांना आणि नेत्यांना निवडणुकीत ओबीसी धूळ चालणार आहे असेही लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे. तसेच, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मनोज जरांगे यांच्या दबावाखाली वाटेल ते मागण्या मान्य करण्याच्या तयारीत असून यातील एकही मागणी कायद्याच्या चौकटीत टिकणारी नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनाही याची किंमत मोजावी लागेल, असा इशाराही लक्ष्मण हाके यांनी दिला आहे.

cmyk

## अग्रलेख

# मणिपूर जळतेय मात्र सरकारला घाम फुटेना !

मागच्या सव्वा वर्षापासून मणिपूर राज्यात लागलेली हिंसाचाराची आग थंडावण्याचे नाव घेत नाही. उलट दिवसेंदिवस ही आग जास्तच वाढत चालली आहे. राज्यात कुकी व मैतेई समाजाने आपापल्या भागावर वर्चस्व निर्माण करून राज्याची अघोषित फाळणीच करून टाकल्याचे चित्र आहे. त्यातूनच कांगपोकपी जिल्ह्यातील लष्करातून निवृत्त झालेले हवालदार आपल्या मित्राला सोडायला म्हणून मैतेईबहुल भागात गेल्यावर जमावाने त्यांना बेदम मारहाण केल्याने त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या हत्येचे तीव्र पडसाद उमटले आणि राजधानी इम्फाळ व लगतच्या थौबेल भागात विद्यार्थी रस्त्यावर उतरले. ते राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य व मुख्यमंत्री बिरेन सिंह यांच्या निवासस्थानावर चालून गेले. पोलिसांनी या विद्यार्थ्यांना पांगविण्यासाठी अश्रुधुराचा वापर केला. त्यात ५५ पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले आणि मणिपूरच्या धुमसत्या आगीचा पुन्हा भडका उडाला. त्यातून मंगळवारी दुपारी इम्फाळमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली.

१६ महिन्यांपासून भारताचा हे सीमावर्ती राज्य वांशिक हिंसाचारात जळत असतानाही ही आग विझविण्यात केंद्र सरकार अपयशी ठरले आहे. मुख्यमंत्री बिरेन सिंह हे पक्षपाती असल्याची भावना दृढ झाल्यानेच राज्यातील वांशिक हिंसाचाराच्या आगीचे वणव्यात रुपांतर झाले आहे. मात्र, तरीही केंद्र सरकार बिरेन सिंह यांना कायम अभय देत आहे. ही केंद्र सरकारची मणिपूर थंड करण्याबाबत नसणारी इच्छाशक्ती आहे की मजबुरी? असाच प्रश्न यातून निर्माण झाला आहे. लोकसभा निवडणुकीनंतर सरसंघचालक मोहन भागवत यांनी मणिपूरच्या परिस्थितीबाबत मोदी व शहा यांचे कान टोचले होते. त्यानंतर तरी मोदी सरकार 'ॲक्शन मोड' वर येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, काही बैठकांचे सत्र व पंतप्रधान मोदींनी केवळ एकदा मणिपूरबाबत सोडलेले अपवादात्मक मौन याव्यतिरिक्त काहीच घडताना दिसत नाही. त्यातून मणिपूरची स्थिती दिवसेंदिवस जास्तच वाईट बनते आहे.

मणिपूरमध्ये आता सुरक्षा दलाच्या जवानांवरच सशस्त्र हल्ले होतायत, त्यांची अत्याधुनिक शस्त्रे लुटली जातायत व त्याचाच वापर करून हिंसाचार केला जातो आहे. त्यात आता शासकीय कर्मचारीही आपापल्या जमातीच्या समर्थनार्थ उघडपणे विभागले गेले आहेत. हे सगळे फाळणीसदृश वातावरण राज्यात निर्माण झालेले असताना आता त्यात विद्यार्थ्यांच्या संतप्त आंदोलनाची भर पडली आहे. 'डबल इंजिन सरकार'च्या फायद्याचे डिंडम वाजवून सत्ता हस्तगत करणाऱ्या भाजपचे दोन्ही इंजिन मणिपुरात पुरते फेल झाले आहेत. इतर बिगर भाजपाशासित राज्यात अशी स्थिती निर्माण झाली असती तर केंद्रातील सरकारने त्या राज्यातील सरकारबाबत एवढे ममत्व दाखवले असते का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाल्याशिवाय रहात नाही. राज्यातील संतप्त जनता थेट सरकार व प्रशासनालाच आव्हान देत असताना व हिंसाचार विकोपाला गेलेला असतानाही मुख्यमंत्री बिरेन सिंह खुर्ची सोडायला तयार नाहीत आणि केंद्र सरकार त्यांना खुर्चीवरून हटवायची हिंमत दाखवत नाही.

थोडक्यात मणिपूर कितीही जळाले तरी सत्ता सोडायची नाही, हाच एकमेव निर्धार केंद्रील भाजपच्या शीर्ष नेत्यांनी केलेला दिसतो. त्यामुळेच दस्तूरखुद्द सरसंघचालकांच्या कानटोचणीलाही अडगळीचा रस्ता दाखविण्यात आला आहे. त्यातून देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील व महत्त्वाचे असणारे हे राज्य मागच्या १६ महिन्यांपासून हिंसाचार व संघर्षाच्या आगीत जळते आहे. 'राष्ट्र प्रथम'चा उठता-बसता जप करणाऱ्या भाजपला आपल्याच तत्त्वाचा व मार्गाचा मणिपूरमध्ये सोयीस्कर विसर पडलेला दिसतो. बिरेन सिंह यांच्यावर कारवाई केली तर या राज्यातील सत्ता गमवावी लागेल, हाच यामागचा केंद्र सरकारचा राजकीय हिशेब दिसतो. तो पुरता लक्षात आपल्यानेच की काय, पूर्णपणे निर्ढावलेले मुख्यमंत्री बिरेन सिंह राज्यातील नियुक्त केंद्रीय सुरक्षा दलावरही राज्य सरकारचेच नियंत्रण हवे, अशी मागणी निर्लज्जपणे करताना दिसतात आणि तरीही केंद्र सरकार त्यांना दोन-चार खडेबोल सुनावताना दिसत नाही. आता मणिपुरात रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी यामुळेच राज्यातील पुरत्या उद्ध्वस्त झालेल्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीबाबत केंद्र व राज्य सरकारला जाब विचारत आहेत. चीन, म्यानमार व बांगला देशाला भिडलेली सीमा असणारे मणिपूर हे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील राज्य आहे व तेथे निर्माण झालेली ही गंभीर परिस्थिती केवळ त्या राज्याच्याच नव्हे तर देशाच्या दृष्टीनेही गंभीर चिंतेची बाब आहे. या परिस्थितीचा चीनकडून फायदा उचलला जाण्याची शक्यता अजिबात नाकारता येत नाही. मात्र, 'राष्ट्र प्रथम'चा नारा देऊन प्रत्यक्षात पक्षीय राजकारण व सत्ताकारण प्रथम हेच धोरण राबविणाऱ्या भाजपच्या 'अजेय जोडी'ला त्याकडे लक्ष द्यावे वाटत नाही, ही देशासाठी व देशाच्या ऐक्यासाठी दुर्दैवाचीच बाब आहे.

# राहुल गांधी यांना धमकी दिल्या प्रकरणी काँग्रेस पक्षाचे भाजपा विरोधात निदर्शने

**जालना । प्रतिनिधी**

**भाजपचे माजी आमदार तरविंदर सिंग मारवा याने लोकसभा विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आज शुक्रवारी रोजी गांधी चमन जुना जालना येथे जालना शहर व जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करून जोरदार निदर्शने आंदोलन करून प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली.**



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या आदेशाने या घटना प्रकरणी संपूर्ण राज्यांमध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी भाजपा विरोधात आंदोलन पुकारण्यात आले होते. या अनुषंगाने आज शुक्रवार रोजी खासदार डॉ.कल्याणराव काळे व आ.कैलास गोरंट्याल व जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख,जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद यांच्या नेतृत्वाखाली जोरदार निदर्शने आंदोलन करण्यात आले.यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी भाजपा आणि संघी विचाराच्या विरोधात घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. याप्रसंगी आमदार कैलास गोरंट्याल यांनी निषेध व्यक्त करताना सांगितले की,खासदार राहुल गांधी यांना भाजप नेत्यापासून धोका निर्माण झालेला आहे.काँग्रेस पक्ष अशा धमक्यांना बिलकुल घाबरत नाही. केंद्र शासनाने खासदार राहुल गांधी यांच्या सुरक्षे मध्ये वाढ करून त्यांना अधिक सुरक्षा देण्यात यावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली. यावेळी जालना शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख महेमूद म्हणाले की,काँग्रेस पक्षाचे नेत्या स्व.इंदिरा गांधी,स्व. राजीव गांधी यांनी देशाच्या एकता व अखंडतेसाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. हा इतिहास जनता विसरू शकणार नाही.भाजपा आणि संघी विचार देशासाठी घातक असून समाजामध्ये विष पेरणारे आहे.या विचारांना काढण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी फुले, शाहू,आंबेडकर विचार सर्वसामान्य पर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी प्रदेश काँग्रेस सरचिटणीस कल्याण दळे,राष्ट्रीय ओबीसीचे समन्वयक राजेंद्र राख,एड. राम कुऱ्हाडे यांनी आपल्या भाषणातून भाजपाचा निषेध व्यक्त केला. यावेळी वसंत जाधव,नंदाताई पवार,राम सावंत,बासेत कुरेशी,दिनकर घेवंदे,शेख वसीम,शेख शमशोदीन,योगेश पाटील,इकबाल कुरेशी,माजी नगरसेवक महावीर ढक्का,अरिफ खान,बालकृष्ण कोताकोंडा,विनोद यादव,धर्मा खिल्लारे,सुभाष मगरे,सुभाष कोळकर,नारायण वाडेकर,मनोहर उघडे,कृष्णा पडूळ,बाबासाहेब सोनवणे,जावेद अली,रघुवीर गुडे,शेख इर्शाद,गणेश चांदोळे,शेख जावेद लकी, अजीम बागवान,अब्दुल रफिक मुक्तार खान,भागवत धाटे शिवाजी वाघ,बळीराम तिडके,वसीम कादरी, सिताराम तुपे, मथुराबाई सोळंके, मोहम्मद रफीक,प्रमोद आल्हाट यांच्यासह आदी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आनंदगाव येथे सामुदायिक आरोग्य शिबिर



**केज । पतिनिधी**

**राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत मा उपमुख्यमंत्री यांच्या समन्वयातून स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय ,जन औषध वैद्कशास्त्र विभाग अंबाजोगाई व मानवलोक यांच्या संयुक्त विद्यमाने आनंदगाव येथे शुक्रवार रोजी मोफत आरोग्य तपासणी व औषध उपचार शिबिर घेण्यात आले. शिबिरासाठी औषध उपचारासाठी लागणारे औषध गोळ्या साहित्य मानवलोक संस्थेकडून उपलब्ध करून देण्यात आले.**

शिबिराची सुरुवात सरपंच अंजना गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. डॉ राजेश संबुरवाड,डॉ गणेश लोखंडे, डॉ मोहिनी जोगदंड, पदवी तर विद्यार्थी डॉ गणेश युसलीवार, डॉ सुमेध,डॉ अतुल कदम,डॉ माधव दुभळकर,डॉ अपूर्वा, डॉ रुचिता सातपुते,डॉ अभारा मिर्झा, समाजसेवा अधीक्षक बाळासाहेब कोठुळे, अशोक वाघोळे, आधिपरिचारक दशरथ घुले, मानवलोक आरोग्य विभाग प्रमुख डॉ ज्योती डबडे, जयश्री शिर्के काजल मुंडे शिबिर सेवा कार्यात सहभाग नोंदवला. यावेळी गावातील दोनशेहून अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी करून औषध उपचार करण्यात आले. जेष्ठ नागरिकांचा यामध्ये विशेष सहभाग होता. गावातच आरोग्य तपासणी व औषध उपचार झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शिबीर यशस्वीतेसाठी डॉ हनुमंत सौदागर, नागेश वैरागे विठ्ठल गावरस्कर आदींनी परिश्रम घेतले.

# चंद्रकांत कारके यांना विधानपरिषदेवर राज्यपाल नियुक्त आमदार करण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या १२ जागापैकी महायुती सरकारच्या वाटाघाटीत आलेल्या राष्ट्रवादीच्या तीन जागेपैकी एका जागेवर जालना जिल्ह्याचे कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके यांना घेण्यात यावे अशी लेखी मागणी पत्राद्वारे माजी आमदार तथा जिल्हाध्यक्ष अरविंदजी चव्हाण यांनी राष्ट्रवादीचे पक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे.**

कला, क्रीडा, साहित्य समाजकार्य या क्षेत्रातून विधान परिषदेच्या १२ रिक्त जागेवर राज्यपाल नियुक्त आमदारांची निवड बरीच वर्ष प्रलंबित होती, तो प्रश्न आता सुटला आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादीला तीन जागा मिळालेल्या असून जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके यांना घेण्याची मागणी जोर धरत आहे. चंद्रकांतजी कारके हे बहुजन चळवळीतील उच्चशिक्षित, अभ्यासू समाजसेवक असून कला, साहित्य क्षेत्रात त्यांची बरेच पुस्तके प्रकाशित झाले आहेत. त्यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेवर तमिळनाडू/ तंजावर येथील



महाराजचे १३ वे वंशज श्रीमंत युवराज संभाजीराजे भोसले यांच्या हस्ते निवड करण्यात आली होती. समाजकार्यासह साहित्य क्षेत्रात त्यांना साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या थोर महापरूषांच्या लिखाणाचा वारसा प्राप्त झाला आहे. ते वास्तववादी लेखक आहेत. शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ या पुरोगामी विचारधारेचे प्रचारक असून ते राष्ट्रवादी पक्षाचे निष्ठावंत पदाधिकारी आहेत. राज्यसह मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात त्यांचा मातंग समाजासह बहुजन समाजात चांगला जनसंपर्क असल्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत त्यांचा उत्कृष्ट वक्ता म्हणून चांगला फायदा होईल. तेव्हा यशवंतराव चव्हाण साहेबांचे बेरजेचे राजकारण बघता विधानसभेच्या राज्यपाल नियुक्त आमदारांमध्ये चंद्रकांत कारके यांचा समावेश करावा अशी मागणी जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदजी चव्हाण यांनी राष्ट्रवादीचे पक्षप्रमुख, उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष खासदार सुनीलजी तटकरे, सरचिटणीस शिवाजीराव गर्जे यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

# भारत फायनान्सची रक्कम लुटणारा आरोपी गोंदी पोलिसांनी पकड, ३ लाखाचा मुद्देमाल जप्त

**अंबड । प्रतिनिधी**

गोंदी पोलीस स्टेशन हद्दीतील रोड रॉबरी चा गुन्हातील फरार प्रमुख आरोपी सचिन गणेश पोखरकर याला अटक करण्यात आली. भारत फायनान्स ची लुटमारी करणारे २ आरोपी यांचेकडून भाग्यनगर ते घुगडेहादगाव रोडवर दिनांक १६/०८/२०२३ रोजी रात्री ०९.०० वाजे सुमारास भारत फायनान्स चे कर्मचारी यांना आडवुन त्याचे कडील रोख रक्कम व मोबाईल टॅब असा ३,५१०००/- रुपये किमंतीचा मुददेमाल बळजबरीने हिसकावुन नेले वरुन गोंदी पोस्टे येथे गुरन ३५५/२०२३ कलम ३९२,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात यापूर्वी आरोपी सुदर्शन ज्ञानेश्वर पोखरकर वय २३ वर्षे, आकाश गणेश पोखरकर वय २३ वर्षे दोन्ही रा. मंठजळगाव ता. अंबड यांना अटक करण्यात आलेली असून गुण्यातील प्रमुख फरार आरोपी सचिन पोखरकर याचा शोध घेत होते त्यास



गोंदी पोलिसांकडून अटक करण्यात आली असून त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली ४,०००००/- रकमेचे स्विफ्टकार हे चारचाकी वाहन जप्त करण्यात आलेले आहे.सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक श्री अजय कुमार बन्सल , अप्पर पोलीस अधिक्षक ,उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड श्री विशाल खांबे यांचे मार्गदर्शनखाली सपोनि आशिष श्रीनिवास खांडेकर यांनी कारवाई केला असुन त्यांना तपास दरम्यान पोउपनि बालाजी पद्मने, पोउपनि बलभीम राऊत, पोहेकॉ १५६३ अशोक नागरगोजे, पोकॉ/पठाडे, पोकॉ/१४ सिध्दीकी, पोकॉ/अशोक कावळे, पोकॉ सचिन साळवे सर्व नेमणूक गोंदी पोलीस स्टेशन यांनी मदत केली आहे.

## पान १वरून...

### बलाढ्य असलेल्या भाजपला

या आलटूनपालटून कमीजास्त येतात. त्यामुळे या दोनच पक्षाकडे कार्यकर्ते आणि नेत्यांची मोठी गर्दी आहे. गेल्या दोन वर्षापासून महायुती झाल्याने भाजपच्या कार्यकर्त्यासह नेत्यांचेही अवघड झाले आहे. गावस्तरापासून ते जिल्हा पातळीवरही नेत्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. पालकमंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत, तर चार आमदारही त्यांचेच असल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांसह नेत्यांचीही पंचाईत झाली आहे. निधी वाटपासून इतर बाबींमध्ये सुध्दा भाजपवाल्यांना संघर्ष करावा लागत असल्याचे चित्र आहे. मात्र याकडे भाजपच्या नेतृत्वाचे दुर्लक्ष असल्याने एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर अशा विचित्र स्थितीमध्ये नेते आणि कार्यकर्ते असल्याचे दिसते. काही दिवसावर विधानसभा निवडणुक आली असून भाजपमधील बऱ्याच नेत्यांना आमदार व्हायचं आहे. ही संख्या मोठी असल्याने येणाऱ्या काळात भाजपला बंडखोरीचा सामना करावा लागणार आहे. माजलगाव, आष्टी, बीड मतदार संघात भाजपमधील एकापेक्षा जास्त नेत्यांना उमेदवारी हवी आहे. यातील सर्वच गेल्या ४ महिन्यापासून कामाला लागले असून उमेदवारी मिळाली नाही तर ऐनवेळेला ते शरद पवार गटात जातील, असे म्हटले जात आहे. ज्यांना शरद पवारांनी उमेदवारी दिली नाही, ते बंडखोरी करीत अपक्ष निवडणुक लढतील, असे दिसते. त्यावेळी अर्धे नेते हे उमेदवारी न मिळाल्याने भाजपला रामराम करतील तर काही नेते पक्षांतर्गत असलेल्या कलहामुळे बाहेरचा रस्ता धरतील, असे म्हटले जात आहे. तसे झाले तर बीड जिल्ह्यात क्रमांक १ वर असलेला भाजप तिसऱ्या स्थानावर फेकला जाईल, असे राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. पंकजा मुंडे यांनी गेल्या ५ वर्षात जिल्हा आणि कार्यकर्त्यांकडे केलेले दुर्लक्ष हेच त्याला कारणीभूत असल्याचे दिसून येत आहे. पंकजा मुंडे यांचा अजूनही राजकीय संघर्ष संपलेला नसून बीड जिल्ह्यातील भाजपचे वर्चस्व कमी झाले तर त्याचा थेट फटका हा पंकजा मुंडे यांनाच बसेल. आपल्याच जिल्ह्यावर पकड नसेल तर पक्ष नेतृत्वाकडूनही त्याची दखल त्यावेळी घेतली जाते. त्यामुळे पंकजा मुंडे यांनी बीड जिल्ह्याकडे व पक्ष बांधणीवर लक्ष दिले तर त्यांनाच त्याचा भविष्यात फायदा होईल.

---------

### १९ सप्टेंबर पासून पावसाचा

नैऋत्य मान्सून १९ ते २५ सप्टेंबर दरम्यान देशातून माघार घेईल, असे भारतीय हवामान खात्याने सांगितले. नैऋत्य मान्सून १ जूनपर्यंत केरळमध्ये दाखल होतो आणि ८ जुलैपर्यंत संपूर्ण देश व्यापतो. तो १७ सप्टेंबरच्या सुमारास वायव्य भारतातून मागे हटतो आणि १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्णपणे माघार घेतो. यंदाच्या वर्षी मान्सूनचा भारतातील हा परतीचा प्रवास १९ सप्टेंबारपासून सुरू होणार आहे. पूर्व आणि ईशान्य भारतात सरासरीपेक्षा १६ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. तर इतर तीन झोन - वायव्य, मध्य आणि दक्षिण भारतात अनुक्रमे ४ टक्के, १९ टक्के आणि २५ टक्के जास्त पावसाची यंदा नोंद झाली आहे.

----------

### देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रातला

राजकीय नेता पक्ष वाचवण्यासाठी निघाला आहे. अफाट संपत्ती केवळ मराठा समाजाच्या जीवावर आहे. हीच अवलाद मराठा समाजाला आरक्षण मिळू देत नाही. आरक्षणावर कोणीच बोलायला तयार नाही. सगे सोयरेची अधिसूचना काढली, आठ महिने झाले तरीही अंमलबजावणी नाही. हैदराबाद गॅझेट लागू करायला अडचणी काय आहेत? ही अडवणूक कशामुळे सुरू आहे. सरकारची भूमिका कळायला तयार नाही. मराठा आणि कुणबी एकच आहे. मराठे जे मागतात ते तुम्ही देत नाही आणि जे आम्ही मागत नाही ते तुम्ही देता, यात आमची चूक काय आहे? ईडब्लूएस रद्द करण्याचा घाट का घातला? सरकार याचे उत्तर देत नाही. देवेंद्र फडणवीस सर्व चालवतात त्यामुळे त्यांच्याकडे आम्ही मागतो. सरकारने अधिवेशन बोलवावे, जो आमदार बोलणार नाही त्याला पाडायचे. नाटक कंपनीने नौटंकी करायची नाही, अधिवेशन बोलवायचे मग समाज बघेल कोणता आमदार बोलणार नाही. यांना अधिवेशन ठेवायचे नाही हे नाटक आणि बहाणा आहे, अशीही टीका त्यांनी यावेळी केली. आता फूट पडू द्यायची नाही आणि कोणत्याही नेत्याला घाबरायचे नाही. २०२४ ला एका-एका काठीचा हिशोब घ्यायचा आता सुट्टी नाही. माझ्या विरोधात खूप टोळ्या आहेत, देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या विरोधात आमदार उभे केले आहेत ही त्यांची चाल आहे. मराठा का संपवायला निघाला आहात? १०६ आमदार मराठ्यांनी निवडून दिले आहेत. आम्ही आमचे आरक्षण मागत आहोत. माझे कर्तव्य मी पार पाडत आहे. मी सरकारला मॅनेज होत नाही. त्यांनी माझ्याविरोधात आंदोलन उभे केले आहे. मी एकटा वटणीवर आणतो. देवेंद्र फडणवीस हा महाराष्ट्रातला सर्वात भित्रा प्राणी आहे, असा हल्लाबोल मनोज जरांगे पाटील यांनी केला.

--------------------

### मंकीपॉक्स विरोधी लसीला

या लसींचे उत्पादन वाढवावे आणि त्या या संस्थांनी विकत घेऊन, ज्या देशात आवश्यकता आहे तेथे याचे वितरण करावे अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत. सध्या १८ वर्षांवरील वयोगटातील व्यक्तींना ही लस घेता येईल, तसेच या लसीचे दोन डोस घ्यावे लागणार आहेत.

------

### अदानी प्रकरण आता सवोच्च

बोलावण्याची मागणी केली आहे. त्यांनी सोशल मीडिया एक्स प्लॅटफॉर्मवर लिहिले कि, स्वीस येथील असणाऱ्या पाच खात्यांमध्ये ३११ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजेच २,६१० कोटी रुपये जमा करण्यात आले. २८ डिसेंबर २०२१ पासून ही चौकशी सुरू होती. यासोबतच त्यांनी सर्वोच्च न्यायालयाला या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची विनंतीही केली आहे. त्यांनी पुढे लिहिले की, ९ ऑगस्ट २०२४ रोजी स्विस फेडरल क्रिमिनल कोर्टाच्या आदेशात, ही खाती गोठवण्याचा अर्ज नाकारण्यात आला आणि त्याचे वर्णन ''अपारदर्शक निधी'' म्हणून करण्यात आले. न्यायालयाच्या दृष्टीने, या निधीमध्ये मनी लाँड्रिंग आणि घोटाळा यासह बेकायदेशीर क्रियाकलापांमधून मिळालेला निधी असल्याचा संशय आहे. अदानी समूहावर अनेक वर्षांपासून असा आरोप होत आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी आरोप केला की, चांग यांचे अदानी समूहाशी असलेले जवळचे संबंध कोणापासूनही लपलेले नाहीत. ते म्हणाले की, ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट (ओसीसीआरपी) च्या तपासणीत असे दिसून आले आहे की चांग आणि त्याचा सहकारी नासिर अली शाबान अहली यांनी इंडोनेशियातून अदानीने आयात केलेल्या कोळशाची किंमत ५२ टक्क्यांनी वाढवली आहे. त्यांचा भ्रष्टाचार उघड झाला आहे. असे जयराम रमेश यांनी म्हटले आहे.

---------

### विभाजन करणाऱ्या देशविरोधी

आले आहेत. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदियाही त्यांच्यासोबत होते. त्यांच्या स्वागतासाठी आपचे नेते आणि कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती. अरविंद केजरीवाल यांनी तुरुंगाबाहेर येताच प्रतिक्रिया दिली आहे. तसेच सरकारवर हल्लाबोलही केला आहे. ते पुढे म्हणाले की, ''हा षडयंत्रावर सत्याचा विजय आहे. माझे आयुष्य देशासाठी समर्पित आहे. माझ्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, माझ्या शरीराचा प्रत्येक थेंब देशासाठी समर्पित आहे. मी माझ्या आयुष्यात खूप संघर्ष केला आहे. मी अडचणींचा सामना केला आहे. देवाने मला मदत केली आहे. प्रत्येक पावलावर देवाने मला साथ दिली, त्यामुळे आता माझी ताकद शंभर पटीने वाढली आहे. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी सकाळी १० लाखांच्या जातमुचलक्यावर केजरीवाल यांना नियमित जामीन मंजूर केला. केजरीवाल यांना यापूर्वीच ईडी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम जामीन मिळाला होता. अरविंद केजरीवाल यांना या वर्षी २१ मार्च रोजी ईडीने आणि २६ जून रोजी सीबीआयने अबकारी प्रकरणात अटक केली होती.

**देशात लोकशाहीचा पाया अजूनही भक्कम - शरद पवार**

अरविंद केजरीवाल यांना जामीन मंजूर झाल्यानंतर शरद पवार यांनी आपल्या एक्स अकाउंटवर ट्वीट करत म्हटले आहे. ''दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून एक गोष्ट स्पष्ट झाली की देशात लोकशाहीचा पाया आजही भक्कम आहे. इतक्या दिवसाचा लढा सत्याच्या मार्गाने निघाला. अधम मार्गाने एखाद्याला नामोहरम करण्याचा कट लोकशाही बुलंद असणाऱ्या देशात कधीच यशस्वी होणार नाही, अशी भावना केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून पक्की झाली.'' असे पवार म्हणाले.

**आप कार्यकर्त्यांचा जल्लोष...**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने आम आदमी पार्टीच्या गोटात आनंदोत्सव साजरा केला जात आहे. पार्टीने तो परत आला आहे, असे ट्विट करत या निर्णयाचे स्वागत केले आहे. दुसरीकडे सत्यमेव जयते...! सत्याला त्रास होऊ शकतो, ते पराभूत होत नाही, असे म्हणत आपच्या मंत्री आतिशी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले.

-----------

### राहुल गांधींना धमकावल्याबद्दल भाजप

असा सवालही काँग्रेसने केला. पंजाबचे माजी मुख्यमंत्री चरणजितसिंह चन्नी आणि पंजाब विधानसभेतील विरोधी पक्षनेते प्रतापसिंह बाजवा यांनी शुक्रवारी (दि.१३) दिल्लीस्थित पक्ष मुख्यालयात पत्रकार परिषदेला संबोधित केले. यावेळी बोलताना चन्नी म्हणाले की, राहुल गांधी अमेरिकेत जे बोलले त्याला पंजाब राज्यातील जनतेचे आणि शिख लोकांचे पुर्ण समर्थन आहे.

---------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४
३

## उद्या बीड येथे होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाचा प्रारंभ

**बीड। प्रतिनिधी**

बीड येथील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सव उद्या दि १५ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाचा प्रांगणात संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन दुपारी ०२.०० वाजता केंद्रीय आयुष राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होत असून, केंद्रीय शहरी विकास राज्यमंत्री ना.टोकन साहू हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे राहणार आहेत. या प्रसंगी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे प्रती कुलगुरू डॉ.मिलिंद निकुंभ हे विशेष अथिती म्हणून उपस्थित राहतील. डॉ.पिनांकिन त्रिवेदी, राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे रजिस्ट्रेशन बोर्डाचे प्रेसिडेंट, राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे सचिव डॉ. संजय

बोर्डाचे सदस्य डॉ.आंनद चतुर्वेदी, राष्ट्रीय आयोगाच्या रजिस्ट्रेशन बोर्डाचे सदस्य डॉ.सेंथीलकुमार, महाराष्ट्र आयुष्यमान भारत या योजनेचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ.राजकुमार पाटील हे सन्मानीय अथिति उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या व प्रथितयश संपादन केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांना मा.मंत्री महोदयांच्या हस्ते अवॉर्ड ऑफ एक्सलन्स या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या निमिताने नॅशनल होमिओपॅथिक सेमिनार तसेच बीड येथून उत्तीर्ण झालेल्या डिप्लोमा, डिग्री, पोस्ट ग्रॅज्युएट झालेल्या व पीएचडी झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती महाविद्यालाचे सल्लागार डॉ.अरुण भस्मे व प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल यांनी दिली आहे. सकाळी १० वाजता नॅशनल होमिओपॅथिक सेमिनारचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये याच महाविद्यालयातुन उत्तीर्ण झालेल्या व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या माजी विद्यार्थ्यांचे विविध विषयांवर व्याख्यान होणार आहे तर दुपारी १२ ते १ राष्याट्रीय होमिओपथिक आयोगा तर्फे आयुष्मान भारत डीजिटल मिशन या विषयावर आयोगाकडून प्रेसिडेंट डॉ.पिनांकिन त्रिवेदी, सचिव डॉ.संजय गुप्ता, रजिस्ट्रेशन बोर्डाचे सदस्य डॉ.सेंथीलकुमार हे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच सकाळी ०९ ते दुपारी ०४ या वेळी प्रेडेक्टिव होमिओपॅथिच्या सौजन्याने मतिमंद रुग्णांकरिता शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे व संध्याकाळी ७ ते १० या वेळात कल्चरल प्रोग्रामचे सुद्धा आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांनी उत्पादन वाढीसाठी घन लागवड व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा-कृष्णा कर्डिले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दीनदयाळ शोधसंस्थान कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई व केंद्रीय कापूस संशोधन संस्था नागपूर यांच्या माध्यमातून पहाडी पारगाव तालुका धारूर जिल्हा बीड येथे दि. २५ रोजी कापूस प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे प्रथम नागरिक बाळासाहेब अर्जुन अंडील प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृष्णा कर्डिले (शास्त्रज्ञ पीकविद्या) व डॉ. प्रदीप सांगळे (पिक संरक्षण) उपस्थित होते. मंचावर सुरज काळम जिल्हा व्यवस्थापक अंकुर सीड्स आणि कृषी सहाय्यक एम. व्ही. मांजरे कृषी विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सुरज पोकळे यांनी प्रस्ताविकातून कापसाच्या अतिघन लागवड पद्धती व प्रकल्पाची माहिती देत कापसाचे उत्पादनात होणारी वाढ समजून सांगितली. कर्डिले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यातील कापसाचे उत्पादन घटत चालले आहे त्यात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. कापसाचे घटत असणारे प्रमाण कापसावर आधारित उद्योगावर विपरीत परिणाम




होत आहे ही समस्या सोडवण्यासाठी कापसाचे उत्पादन वाढविणे आवश्यक आहे त्यासाठी कापसाची सघन किंवा अतिघन लागवड आवश्यक आहे असे सांगितले, कापूस उत्पादन वाढविण्यासाठी अतिघन कापूस लागवड कशी फायद्याचे आहे कपाशीच्या झाडांचे गळफांदी व शेंडे खुडल्यामुळे होणाऱ्या उत्पादन वाढीचे महत्त्व पटवून जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची माहिती दिली हेही त्यांनी समजून सांगितले व अतिघन कापूस लागवडी बाबत शेतकऱ्यांना त्यांचे अनुभव विचारले कापसाच्या मूल्यवर्धनासाठी कृषी विज्ञान केंद्र अंतर्गत धारूर येथे एफ पी ओ स्थापन करण्यात आली आहे.

डॉ. सांगळे म्हणाले की, फवारणी कमी करण्याच्या अनुषंगाने निमार्क,कामगंध सापळा, पिवळे निळे चिकट सापळे, गुलाबी बोंड आळीसह कपाशीवरील अन्य किडींच्या व दहिया, करपा, आणि आकस्मिक मर व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन केले.

शिवाजी कर्जत यांनी ड्रोन तंत्रज्ञान विषयी सांगितले की, ड्रोन ला एका विशिष्ट संगणकीय प्रणाली द्वारे वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्याची सोय केलेली असते ड्रोन चा वापर शेतीमधील अधिक कामे काटेकोर आणि अचूक पद्धतीने करण्यासाठी त्याचा वापर होतो. वेळेची व मनुष्यबळाची बचत होते. पशुधन निरीक्षण व व्यवस्थापन होते त्यासंदर्भात व्हिडिओद्वारे शेतकऱ्यांना समजावले.

कृषी विभागातील प्रतिनिधी कृषी सहाय्यक एम. व्ही. मांजरे यांनी कृषी पंप योजना व कापूस वेचणी पिशवी आणि केंद्र व राज्य सरकारच्या विविध कृषी विषयक योजनांची माहिती याबाबत मार्गदर्शन केले.

असा आहे प्रकल्प

केंद्रीय कृषी आणि वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या माध्यमातून हा प्रकल्प भारतभर राबवला जात आहे या प्रकल्प अंतर्गत बीड जिल्ह्यातील ४३८ शेतकऱ्यांनी २९५ हेक्टर मध्ये सघन आणि अतिघन कापसाची लागवड केली आहे या पद्धतीमध्ये कापूस बियाण्याचे प्रति एकर सघन मध्ये दोन ऐवजी चार बियाणे पाकिटे वापरावी लागतात आणि अतिघन लागवड मध्ये एकरी सहा पाकिटे बियाणे वापरावी लागतात यासाठी बीजी-२ संकर वाणांची निवड केली जाते झाडांची संख्या वाढल्याने बोंडांची संख्या वाढते त्यामुळे एकरी किमान ११ ते १३ क्विंटल कापसाचे सहज उत्पादन होते अशी माहिती कृष्णा कर्डिले यांनी दिली. कार्यक्रमाचे संचालन रविंद्र अंबड यांनी केले. प्रदीप चव्हाण यांनी आभार मानले. धारूर व वडवणी तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तालखेड येथे शिवसेनेची बैठक संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील तालखेड फाटा येथे माजी मंत्री तथा शिवसेनेचे बीड जिल्हा सह संपर्क प्रमुख बदामराव आबा पंडीत यांनी गेवराई विधानसभेच्या पुर्वतयारी साठी टाकरवण व तालखेड सर्कल मधील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांची बैठक आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बैठकीस उपस्थित राहुन येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आबांना मोठ्या मताधिक्याने विजयी करून आमदार करण्यासाठी आपण सर्वांनी कामाला लागावे असे सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती युध्दजीत दादा पंडित, युवा नेते रोहित भैय्या पंडित, जिल्हा परिषदेचे माजी सभापती पंढरीनाथ बापू लगड, माजी पंचायत समिती सदस्य प्रशांतजी मोरे, युवासेना गेवराई शहर प्रमुख सिराज भाई, जायकुचीवाडी चे येवले सरपंच, अशोक नाईकनवरे, तीर्थराज पांचाळ सह सर्व शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते.

## श्री मंगलनाथ मल्टिस्टेट सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्काराने सन्मानित

**माजलगाव । प्रतिनिधी**

शिर्डी तेथे राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीद्वारे २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार श्री मंगलनाथ मल्टिस्टेट माजलगाव या संस्थेला प्राप्त झालेला




आहे.

शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टीस्टेट च्या वतीने दि १२ सप्टेंबर रोजी सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते.सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष फेडरेशन ऑफमल्टिस्टेट चे अध्यक्ष श्री काकासाहेब कोयटे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे केंद्रीय सहकार सचिव डॉ. आशिष भूतानी व राज्याचे माजी सहकार मंत्री श्री सुभाष देशमुख हे होते.तर प्रमुख उपस्थिती मध्ये बुलढाणा अर्बनचे विद्यमान अध्यक्ष श्री राधेश्याम चांडक हे होते.फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट हि संस्था सहकार चळवळीमध्ये आपले योगदान देणारे व शासनाने निर्गमित केलेल्या आदेशाचे पालन करून कार्य करणाऱ्या संस्थांचे मूल्यमापन करून संस्थांना पुरस्काराने सन्मानित करते.सुरक्षित व्यवसाय, सभासदांना वेळेत सुविधा व सुरक्षित कर्ज वाटपाच्या माध्यमातून सभासदांच्या ठेवींना सुरक्षा देणे या बाबींना प्राधान्य देत श्री मंगलनाथ मल्टीस्टेटने एक आदर्श संस्था म्हणून नावलौकिक केले आहे.सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यात सदैव सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकीला चालना देण्याचे काम संस्था सातत्याने करते. या सर्व बाबीची दखल घेत राष्ट्रीय फेडरेशन ऑफ मल्टिस्टेटच्या वतीने संस्थेला २०२३ चा सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार प्रधान करण्यात आला. सदरील पुरस्कार संस्थेच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक

ॲड.रवींद्र कानडे,संस्थेचे सल्लागार वीर विनोद ,जनरल मॅनेजर श्री अडेप राजेंद्र यांनी स्वीकारला.तसेच संस्थेचे अध्यक्ष आर.जी.कानडे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, संस्था शासनाने निर्गमित केलेल्या सर्व आदेशाचे तंतोतंत पालन करून कार्य करते त्याच बरोबर संस्था स्थापनेपासून लेखापरीक्षण अ वर्ग प्राप्त राहिली असून स्थापनेपासून नफ्यात आहे यापुढे देखील संस्था समाजातील गरजा ओळखून कार्य करणार असून येत्या काळामध्ये सभासदांच्या ठेवींना अधिक सुरक्षा देण्याचे काम करणार आहे व सदरील पुरस्कार संस्थेचे संचालक मंडळ,कर्मचारी,नित्यनिधी प्रतिनिधी , ठेवीदार,कर्जदार व हितचिंतक,सभासद व मित्रपरिवार यांना समर्पित करण्यात येत आहे असे सांगितले.



म्हसोबावाडी : एन ईई टि (नीट) परिक्षेत आष्टीतील अफ्फान अश्फाक कुरेशी यांने ६१४ मार्क्स मिळाल्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. युवा नेते ॲड रिजवान शेख, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, भैरव चव्हाण, जिशान सय्यद,अजर शेख, फजल सौदागर आदी दिसत आहेत.

## कालिका परिवार आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते श्रींची महाआरती

**जालना । प्रतिनिधी**

### भारतीय संस्कृती चे दर्शन-पोलीस अधीक्षक

श्री अनोखा गणेश मंडळाचे धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रम आनंददायी असून सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा होत असलेल्या गणेशोत्सवात अनोखा गणेश मंडळाने सादर केलेल्या देखाव्यातून भारताच्या आणि महाराष्ट्राच्या गौरवशाली संस्कृतीचे दर्शन घडते असे नमूद करत जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी शुभेच्छा दिल्या.

दशकाकडे वाटचाल करत असलेल्या श्री.अनोखा गणेश मंडळाने जालन्यातील गणेशोत्सवाच्या इतिहासात प्रथमच चांदीची सोन्याचा मुलावा असलेली आकर्षक मूर्ती, दरवर्षी लक्षवेधी देखावे ,भाविकांसाठी प्रसादी, लहान बालकांपासून ते अबाल वृद्धांपर्यंत सर्वांना कौटुंबिक आनंदाची अनुभूती श्री अनोखा गणेश मंडळाने दिली असून जालनेकरांना गणेशोत्सवाचा खरा आनंद या मंडळात मिळत असल्याची भावना कालिका स्टीलचे संचालक उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी व्यक्त केली.



छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळील श्री अनोखा गणेश मंडळाच्या बाप्पांची गुरुवारी ( ता. १२) कालिका परिवारातील सदस्य आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. याप्रसंगी घनश्यामदास गोयल यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी अरविंद अग्रवाल (हैदराबाद),अरुण अग्रवाल ,मनोज जिंदल, मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, संस्थापक अजय जगदीश भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल (रूपम), अनिल सोनी,अतुल मंत्री,धीरेंद्र मेहरा ,डॉ.रितेश मिश्रा, जगदीश मुंदडा,राजेश अग्रवाल (रूपम), पुरूषोत्तम भक्कड,बबलू सारस्वत,हर्षद चोरडिया, गणेश तिवारी, राजकुमार दायमा (सरकार),गौरीशंकर देवीदान,अनिल पंच, सचिन लोढा,रोहित भुरेवाल,मनोज बंब, गणेश भुरेवाल, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोरजी तिवारी, मेघराज चौधरी, सुदर्शन मुंदडा ,महावीर मरलेचा,आदींची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक बन्सल आणि कालिका परिवारातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी हरियाणा येथील सुनील -अनिल तिलकधारी आर्ट्स ग्रुपच्या कलापथकाने रामायणातील प्रसंगांचे बहारदार नृत्य आणि जीवंत अभिनय कलेद्वारे जबरदस्त सादरीकरण करून उपस्थितांच्या डोळ्यांची पारणे फेडली. मंडळातील सदस्यांसह महिला, बच्चे कंपनी आणि भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. दरम्यान शनिवारी एकादशी निमित्त भाविकांना उसळ वाटप केली जाईल तसेच कलापथकाद्वारे महाकालीचा जिवंत देखावा सादर केला जाणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## विज्ञान आणि अध्यात्म यामुळे विश्वातील ज्ञान मिळते -प्रा.डॉ.अश्विन झाला

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अध्यात्म आणि विज्ञानाची सांगड घातल्याचे सर्वत्र दिसते कारण विज्ञान व अध्यात्म यांच्याव्दारे विश्वातील ज्ञान होऊ शकते विज्ञान विश्लेषण तर अध्यात्म संश्लेषण करते असे मत जळगांव येथील प्रा.डॉ.अश्विन झाला यांनी व्यक्त केले

योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी गणेशोत्सव व्याख्यानमालेत ते बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक एल.जी.वैद्य होते.

पुढे बोलताना प्रा.झाला म्हणाले की,

विज्ञान सांगते की मानवाच्या मनात साठ हजार विचार येतात पण या विचारांपैकी किती विचारांचा संकल्प होतो ही ज्याची त्याची धारणा आहे

मानवी शरीर आहे तो पर्यंतच अध्यात्म आणि विज्ञान राहणारच आहे विज्ञान बाहय प्रमाणाने तर अध्यात्म आंतरिक प्रतीतीने शोध घेते विज्ञानाने अनेक गोष्टी सिद्ध केल्यात तर बऱ्याच गोष्टी सिद्ध नाहीत असा एक समज आहे पण सर्वच जण त्या नियंत्रणासाठी प्रयत्नशिल असतात त्याचा त्या त्या वेळी परिणामही दिसतो असेही प्रा.झाला म्हणाले पाहुण्यांचे स्वागत प्राचार्य पी.आर. थारकर यांनी केले प्रास्तविक व संचालन प्रा.रमेश सोनवळकर यांनी केले.

यावेळी संस्था पदाधिकारी, संचालक, कर्मचारी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### मनसेची बीड विधानसभा

श्रीराम बादाडे,महिला आघाडी प्रदेश उपाध्यक्ष वर्षा जगदाळे,जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे,जिल्हा सचिव सोमेश कदम,विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष ऋषी गिराम,रोजगार विभागाचे जिल्हाध्यक्ष लालासाहेब ढाकणे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष आशाताई कुटे,महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष कल्पना कवठेकर आदिंसह मनसे चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### व्यसनाच्या आहारी न जाता

करण्यात आले होते.यावेळी किर्तन रूपी सेवे प्रसंगी हभप भंडारे महाराजांनी केले.

शालेय साहित्याच्या वाटपासह वृक्षारोपण

सांगवी गावातील दोन्ही शाळेतील विद्यार्थांना शालेय साहित्य वाटप करून शाळा व गाव परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

गावासह पै पाहुण्यांना जेवण

अभिष्टचिंतनाच्या निमित्ताने गावासह,परिसरातून व बाहेर गावावरून आलेल्या पै पाहुण्यांसाठी जेवाणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जयदत्त भैय्या धस, जि.प अध्यक्ष सविताताई गोल्हार, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे,सामाजिक कार्यकर्ते संदिप खाकाळ,उद्योजक पांडुरंग सोनवणे,सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बाबासाहेब चव्हाण,शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक दादा सोनवणे,ह.भ.प.प्रा.विजय राजपुरे,सरपंच दादासाहेब जगताप,संतोष मेहेत्रे, जाकीर शेख,ह.भ.प.देवीदास गर्जे, सतिश ढवळे,शरद कुमखाले,पत्रकार नितीन कांबळे,प्रा.संजय खंडागळे,सुरेश कांबळे,दादा पवळ,समीर शेख याच्यावर अनेक मान्यवर उपस्थित होते.

### शासनाने निवासी आश्रम शाळांना

मंत्रीसाहेब आपण एक लोकप्रिय मुख्यमंत्री आहात तुम्हाला सर्व जनतेच्या सुखदुःखाची जाण असून आमच्या या राज्यातील अनु जातीच्या शाहू फुले आंबेडकर निवास आश्रम शाळांना तात्काळ अनुदानापासून वंचित ठेवलेल्या शाळांना तात्काळ १००% अनुदान व शिक्षक कर्मचाऱ्यांना शंभर टक्के देण्याची कृपा करावी अशी मागणी लहू बनसोडे यांनी पत्रकाद्वारे केली यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर यांची उपस्थिती होती

### तालुकास्तरीय पिक

हस्ते देण्यात आला. सदरील पुरस्कार त्यांना मिळाल्याबद्दल त्यांचे सरपंच प्रेमचंद लोढा, उपसरपंच अंकुश कळासे, ग्रामपंचायत सदस्य गौतम नाईकवाडे यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी बी. ए. चव्हाण, उद्योजक सतीश जोगदंड, सामाजिक कार्यकर्ते विजयराजे शिंदे, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर गुंजाळ, गणेश मिटकरी, प्रवीण गुंजाळ, राजेश गुंजाळ, अशोक काशीद, श्रीराम नाईक, संजय माने, मन्मथ विधाते, नितीन औताडे, निलेश सालपे, जीवन मस्के, आदिनाथ नाईकवाडे, गणेश नाईकवाडे, अण्णा नाईकवाडे, रवि मस्के, रविंद्र शिंदे, कैलास तोडकर, हनुमंत तोडकर, विजय औताडे, सचिन जाधव, गजानन नाईक, ज्ञानेश्वर गजरे, सुनील नाईक, सागर तोडकर, आनंद नाईकवाडे, पत्रकार अमोल तांदळे आदींनी प्रत्यक्ष भेटून तर काहींनी फोन करून दूरध्वनीवरून शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## नगर पंचायत कार्यालय, शिरूर कासार ता.शिरूर कासार जि.बीड

दि.१३/०९/२०२४

### जाहीर प्रगटन

विषय पथविक्रेता (उपजीविका सरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम २०१६ अंतर्गत पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक सन २०२४ राबविणेसाठी मान्यता मिळणे बाबत

संदर्भ - मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आदेश जा.क्र.काआ/औसं/प.वि./जिल्हाधिकारी,बीड /छ.सवि/आदेश/२०२४/कार्या-९ दि.१४/०८/२०२४

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, मा.कामगार आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबै यांचे आदेश जा.क्र.काआ/औसं/प.वि./जिल्हाधिकारी,बीड /छ.सवि/आदेश/२०२४/कार्या-९ दि.१४/०८/२०२४ नुसार पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम २०१६ अंतर्गत पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक सन २०२४ करिता श्री.चंद्रकांत चव्हाण, मुख्याधिकारी नगर परिषद माजलगाव, जिल्हा बीड यांना नगर पंचायत शिरूर कासार अंतर्गत सदरील निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याकरिता निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

शहरी पथविक्रेता समितीमधील पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या ०८ जागांकरिता निवडणूक घेणेकरिता खालीलप्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | गटाचे नाव | पद संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण (महिला राखीव) | ०१ | महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) नियम २०१६ अंतर्गत नियम ११ (३) (ख.एक) अन्वये |
| २ | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | ०१ | |
| ३ | अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) | ०१ | |
| ४ | इतर मागास वर्ग (सर्वसाधारण) | ०१ | |
| ५ | अल्पसंख्याक (महिला राखीव) | ०१ | |
| ६ | विकलांग (महिला राखीव) | ०१ | |
| ७ | सर्वसाधारण | ०२ | |

तथापि सदरील निवडणूक कार्यक्रम हा कालबद्ध स्वरूपाचा असून निवडणूकीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे असेल.

### निवडणूक कार्यक्रम

| अ.क्र. | विवरण | दिवस व दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | मतदारांची यादी प्रसिद्ध करणे | १८/०९/२०२४ | दु.१२.०० वा. | निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, शिरूर कासार नगरपंचायत |
| २ | नामनिर्देशन वाटप करणे | दि.१८/०९/२०२४ ते २३/०९/२०२४ | सकाळी ११.०० वा. ते सायं.५.०० वाजेपंत | |
| ३ | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे | २३/०९/२०२४ २६/०९/२०२४ | सकाळी ११.०० वा. ते सायं.५.०० वाजेपंत | |
| ४ | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करणे | २६/०९/२०२४ | सकाळी ११.०० वा. ते सायं.५.०० वाजेपंत | |
| ५ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्ध करणे | २७/०९/२०२४ | छाननीनंतर | |
| ६ | नामनिर्देशन पत्र माघार घेणे तसेच आक्षेपांचे निराकरण करणे | ३०/०९/२०२४ | दु.३.०० वा.पर्यंत | |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या पात्र उमेदवारांना चिन्हाचे वाटप व अंतिम यादी प्रसिद्ध करणे | ०१/१०/२०२४ | सकाळी ११.०० वा. | |
| ८ | मतदान घेणे | ०३/१०/२०२४ | सकाळी ७.०० वा. ते सायं.५.०० वाजेपर्यंत | |
| ९ | मतमोजणी | ०३/१०/२०२४ | सकाळी ११.०० वा. | |
| १० | निवडणूक निकाल जाहीर करणे | ०३/१०/२०२४ | मतमोजणी नंतर | |

तथापि शहरी पथविक्रेता समितीमधील पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या ०८ जागांकरिता निवडणूक घेणे करिता पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) नियम २०१६ अंतर्गत पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक (सन २०२४) प्रक्रिया राबविणेसाठी संचिका मान्यतेस्तव सादर.

स्वाक्षरित/-
**श्री.चंद्रकांत चव्हाण**
निवडणूक निर्णय अधिकारी
पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४
नगर पंचायत शिरूर का.ता.शिरूर का.जि.बीड



# नांदेड विभागात यंदा ९०.२८ लाख टन गाळपाची शक्यता

नांदेड : नांदेड विभागात गतवर्षीच्या तुलनेत उसाचे लागवड क्षेत्र घटले, तरी सध्याच्या पुरेशा पावसाने उसाच्या वजनात वाढ होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नांदेड विभागातून ९०.२८ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप होण्याची शक्यता आहे. यंदा क्षेत्र घटले, तरी उत्पादनावर फारसा परिणाम होणार नसल्याचे प्रादेशिक सहसंचालक (साखर) कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे.

नांदेड विभागात नांदेडसह हिंगोली, परभणी व लातूर या चार जिल्ह्यांचा समावेश होतो. या चार जिल्ह्यातील २९ ते ३१ साखर कारखाने गाळप हंगाम सुरू करतात. या चार जिल्ह्यांत मागील वर्षी (२०२३-२४) ऊस लागवडीचे क्षेत्र एक लाख ६६ हजार ८५५ हेक्टर इतके होते. तर यंदा एक लाख २५ हजार ४८५ हेक्टर आहे. यात ४१ हजार ३७० हेक्टरने घट झाली आहे. तसेच मागील वर्षी (जून २०२३) मराठवाड्यात नांदेड जिल्हा सोडला, तर, इतर जिल्ह्यात पावसाने ओढ



दिल्यामुळे सर्वच पिकांना फटका बसला होता. विशेषतः पाणी कमी झाल्याने उसाचे वजन घटले होते. त्यामुळे सरासरी १० ते १५ टक्के उत्पादन घटणार अशी शक्यता प्रादेशिक साखर सहसंचालकांकडून वर्तविण्यात आली होती. परंतु मध्यंतरी झालेल्या अवकाळी पाऊस व कारखान्यांनी उसाचा रस इथेनॉलकडे न वळविल्याने साखरेचे उत्पादन वाढले होते. याशिवाय विभागातील काही कारखान्यांनी गाळपाची क्षमता वाढवून घेतली होती. त्यामुळे क्षेत्र घटल्याचा फारसा परिणाम झाला नाही. नांदेड जिल्ह्यातील ऊस हिंगोली जिल्ह्यात दरवर्षी गाळपासाठी जातो. या वर्षी (२०२४-२५) साधारणतः २.५० लाख मेट्रिक टन ऊस हिंगोली जिल्ह्यातील साखर कारखाने गाळप करतील. तसेच लातूरमधील कारखाने धाराशिव व बीड इतर जिल्ह्यातील २.८० लाख मेट्रिक गाळप करतील. तसेच परभणी जिल्ह्यातील कारखाने बीड व जालना जिल्ह्यांतील पाच लाख मेट्रिक ऊस गाळप करतील. त्यामुळे विभागातील एकूण गाळप ९०.२८ लाख मेट्रिक टन इतके होईल, असे साखर विभागाकडून सांगण्यात येत आहे.

## मेंढीपालन करुन कमवता येतात लाखो रूपये



पशुधन : भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील बहुतांश लोक शेती व संबंधित कामांवर अवलंबून आहेत. देशातील अनेक भागात विविध प्रजातींचे प्राणी पाळले जातात. ज्यामध्ये गाय, म्हशीपासून शेळी, उंट यांचा समावेश होतो. दुग्धव्यवसायासाठी या प्राण्यांचे संगोपन केले जाते. पण असाही एक प्राणी आहे जो दुधासाठी नाही तर लोकर मिळवण्यासाठी पाळला जातो. देशातील अनेक भागात मेंढ्या पाळल्या जातात. मेंढीपालनातून दूध तसेच लोकर मिळते. भारतातील बहुतांश भागात मेंढीपालन केले जाते. जेव्हा तुम्ही मेंढीपालन सुरू करता तेव्हा तुम्ही मेंढ्यांच्या सुधारित प्रजाती निवडाव्यात, जेणेकरून तुम्हाला अधिक दूध आणि लोकर मिळू शकेल.

मालपुरा, जैसलमेरी, मंडिया, मारवाडी, बिकानेरी, मारिनो, कॉर्डिलेरा माबुटू, छोटा नागपुरी आणि शहाबाद या भारतातील मेंढ्यांच्या जातीचे उत्पन्न मिळवते. मेंढीपालनातून चांगले पैसे कमवायचे असतील तर त्यांच्या स्वच्छतेकडे आणि आरोग्याकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. जेव्हा त्यांच्या खाण्यापिण्याचा प्रश्न येतो. हा कचरा शेतात खत म्हणून वापरला जातो.

कळपातील मेंढ्यांना चरायला व बाहेरगावी नेले पाहिजे. मेंढ्यांचे आयुष्य साधारणतः ७ ते ८ वर्षे असते, परंतु ते शेतकरी आणि पशुपालकांसाठी पैसे कमवण्यासाठी पुरेशी लोकर तयार करतात. १५ ते २० मेंढ्यांचे पशुपालन करायचे असेल तर जातीनुसार एका मेंढीची किंमत तीन हजार ते आठ हजार रुपयांपर्यंत असू शकते. २० मेंढ्या खरेदी करण्यासाठी सुमारे १ लाख ते १.५ लाख रुपये खर्च येतो. २० मेंढ्यांसाठी ५०० स्क्वेअर फूट स्टॅबल पुरेसे असेल, जे ३०,००० ते ४०,००० रुपये खर्चून बांधले जाऊ शकते. यामुळे याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल.

## कमी गुंतवणुकीत करा शेणापासून लाकूड निर्मितीचा व्यवसाय

शेणखताच्या लाकडाचे महत्त्व आणि उपयोग यासंबंधीची लोकांमध्ये जागरूकता वाढून येत्या काही वर्षांत अनेक पटींनी वाढण्याची शक्यता आहे. परंतु शेणखत टंचाईमुळे ही मागणी पूर्ण करणे हे एक आव्हान आहे. त्यामुळे जे शेतकरी किंवा पशुपालक हा व्यवसाय करू इच्छितात त्यांच्यासाठी हा एक भरभराटीचा आणि चांगला नफा मिळवून देणारा व्यवसाय ठरू शकतो.

शेणखताचे लाकूड मुख्यतः बायोगॅस बनवण्यासाठी किंवा सेंद्रिय खतासाठी वापरण्यात येते हे आपल्याला माहीत आहे. शेण हे सर्व प्रकारे फायदेशीर आहे आणि पर्यावरणाला पोषक आहे. शेणाचा वापर करून बनवलेले लाकूड हवन, अध्यात्मिक यज्ञ, अग्निहोत्र, गृहपाठ, विधी, पूजापाठ आणि इतर धार्मिक कार्यांमध्ये उपयोगी आहे. शेणाचे लाकूड बनवण्याच्या व्यवसायात सुरुवातीला ५० हजार रुपयांपर्यंत गुंतवणूक करावी लागेल. जेणे करून तुम्ही शेणाचे लाकूड बनवण्यासाठी मशीन आणि इतर आवश्यक वस्तू खरेदी करू शकता.

शेणखत लाकूड मशीन : शेणापासून लाकूड बनवण्याच्या मशीनची किंमत भारतीय बाजारपेठेत ४२ हजार ते १ लाख रुपये आहे. या मशीनच्या मदतीने तुम्ही १ किलो वजनाचे लाकूड १५ सेकंदात सहज तयार करू शकता. तुम्हाला मशीनसाठी वेगळे दुकान किंवा फॉर्म खरेदी करण्याची गरज नाही. या नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रदूषणावरही नियंत्रण ठेवता येणार आहे. शेणापासून लाकूड बनविण्याची मशीन तुम्ही सहजपणे ऑनलाईन पोर्टलवर खरेदी करू शकता.

व्यवसायासाठी कच्चा माल : या व्यवसायासाठी गायीचे शेण, वाळलेला भुसा, गवत आणि शुद्ध पाणी फक्त या कच्च्या मालाची गरज आहे.व्यवसायासाठी आवश्यक जागा : हा व्यवसाय सुरू करण्यासाठी सुमारे



२५०० चौरस फूट क्षेत्रफळाची आवश्यकता असते. याशिवाय, मशीन सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी अंदाजे १००० चौरस फूट क्षेत्र आवश्यक असेल. ज्या भागात मशीन ठेवणार आहात त्यावर छत असणे गरजेचे आहे.

आवश्यक नोंदणी आणि परवाने : या व्यवसायासाठी एमएसएमई नोंदणी करणे गरजेचे आहे. एमएसएमई अंतर्गत तुमचा व्यवसाय नोंदणी केल्यानंतर, तुम्हाला कर्जाची रक्कम सहज मिळू शकते. तुम्ही या कर्जाची रक्कम हा व्यवसाय चालवण्यासाठी लागणारी मशीन खरेदी करण्यासाठी वापरू शकता. शेणाचे लाकूड बनवण्याचा व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला ट्रेड लायसन्स मिळणे आवश्यक आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एनओसी: हा व्यवसाय सुरु करताना प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एनओसी मिळवणे गरजेचे आहे.

शेणाचे लाकूड बनवण्याची पद्धती : सर्व प्रथम, ६०:३०:१० च्या प्रमाणात शेण, कोरडा पेंढा आणि कोरडे गवत यांचे मिश्रण तयार करा. हे मिश्रण टाकावे लागेल. लाकूड बनवणारे यंत्र कच्च्या मालाचे मिश्रण लाकडी वडीमध्ये रूपांतरित करते आणि बाहेर फेकते. यंत्रातून बाहेर आलेली लाकडी वडी नाजूक तसेच ओली असते. ही लाकडी वडी कोरडी होण्यासाठी तुम्हाला ती सूर्यप्रकाशाखाली ठेवावी लागेल. मोकळ्या वातावरणात ही लाकडी वडी कोरडी होण्यासाठी सुमारे ५ ते १० दिवस लागतात. सुकल्यानंतर हे शेणखत बाजारात विकण्यासाठी तयार होते.

# जैविक कुंपण बनवा आर्थिक उत्पन्न मिळवा

जैविक कुंपण हे शेतमालाची अथवा शेतीतील अवजारांची चोरी वाचविण्यासाठी, जनावरांचा उपद्रव व त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतीला करण्यात येणारे एक वनस्पतींचे कुंपण असते. यासाठी बहुतेकवेळी जलद वाढणाऱ्या, प्रतिकूल वातावरणातही तग धरणाऱ्या काटेरी वनस्पतींचा वापर करण्यात येतो. या वनस्पती अथवा झुडुपे ही जनावरांना खाण्यास निरुपयोगी असणे आवश्यक आहे.

काही भागात हरिण, रानडुकरे, सांबर, माकडे आदींचा उपद्रव बऱ्याच भागात कमालीचा आहे. या जिवांना मारणे हा कायद्याने गुन्हा आहे. हे प्राणी पिके खातात, शिवाय नासधूसही मोठ्या प्रमाणात करतात. दिवसभर काम केल्यानंतर रात्रीसुद्धा शेतात राखणीला जावे लागते. एवढे करूनही पिकाचे पूर्ण संरक्षण होत नाही. शेतकऱ्यांवर हल्ले झाल्याच्याही घटना आहेत. आर्थिक अडचणीमुळे मोठ्या क्षेत्रावर तार कुंपण करण्याचा खर्चही पेलवणे शक्य नसते. तार कुंपणासाठीचा खर्च एकरी ४० हजारांपेक्षा अधिक आहे. शिवाय क्षेत्र मोठे असल्यास तो लाखाच्या घरात जातो अधिक विचार व अभ्यास करता करवंद, घायपात, बांबू तसेच निवडुंगाचे कुंपण उपयोगी ठरू शकते. रानावनात वर्षानुवर्षे दिसणारी काटेरी झाडे असून कुठलेही जनावर त्यास खात नाही. तीक्ष्ण काटे असल्याने वन्यजीव त्याच्या आसपासही जात नाहीत व त्यातून आर्थिक उत्पन्नही मिळवता येते.

संजीव कुंपणाचे होणारे फायदे : वन्यजीवांचा



त्रास कमी होईल किंवा संपेल. मृदासंवर्धनास मदत थंडीच्या लाटेत पिकाचे नुकसान कमी. कीटकांचा त्रास कमी होतो. आर्थिक फायदेशीर ठरते. येणार खर्च हा तुलनेत फारच कमी आहे.

करवंद : करवंदांची कॅरिसा नावाची जी जात आहे ती जम्मू-काश्मीर व पंजाबमध्ये कुंपणासाठी आणि सुगंधी फुलांसाठी लावतात. हिच्या पानांमध्ये भरपूर टॅनिन असते ती भारतात सर्वत्र उगवते. हे मध्यम आकाराचे काटेरी झाड असते. पण चांगलाच फल्लर (झुडूपासारखे) वाढते. करवंदाचे झाड लवकर मोठे होत नाही. खूप हळूहळू वाढते. शेळ्या-बकऱ्या या झाडाचा पाला खात नाहीत. तसेच काटेरी झाड असल्याने कुंपण करण्याच्या कामी येते. पावसाळ्यात करवंद लागतात. सुंदर दिसतात. करवंदाच्या फळांची भाजी, रायता (लोणचे) चटणी, मुरब्बा करतात. तसेच कच्चेसुद्धा खातात. काहीजण वरणात टाकतात चटनीने तोंडात चव येते. करवंदे आंबट असतात

निवडुंग : निवडुंगाची तटबंदी करा :पहिल्या टप्प्यात छोट्या फांद्या लावाव्यात. कुठल्याही व्यवस्थापनाशिवाय झाडांची भरघोस वाढ होते. शेताला चहूबाजूंनी जणू तटबंदी तयार होते. झाडे १० ते १२ फूट उंच करावीत. प्रत्येक दोन झाडांमधील अंतर एक फूट ठेवावे. झाडांचा बुंधा मजबूत झाल्यावर, कुठलाही प्राणी आत शेतात शिरण्याची हिंमत करीत नाही. परिणामी, पीक राखणदारीचे काम बंद होते. कुंपणावर दोडका, कारले, वाल आदी वेलवर्गीय पिकांची लागवडही करता येते. व यातून आपल्याला आर्थिक उत्पन्न ही साधता येते. घायपात : शेतजमिनीच्या बांधावर लागवड केली जाणारी घायपात वनस्पती घायाळ म्हणूनही ओळखली जाते. ही वनस्पती मूळची मेक्सिकोतील तसेच अमेरिकेच्या दक्षिणेकडील संयुक्त संस्थानांतील असून पंधराव्या शतकात पोर्तुगीज लोकांनी ही वनस्पती भारतात आणली. भारतात हिची लागवड कर्नाटक, तमिळनाडू, केरळ व महाराष्ट्र या राज्यांत मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यांचा रंग करडा हिरवा असून दोन्ही कडांवर व टोकांवर तीक्ष्ण व लहान काटे असतात. त्यामुळेच यांची कुंपणा साठी वापर केला जातो. या वनस्पतीला प्रादेशिक हवामानानुसार दहा ते साठ वर्षांदरम्यान एकदाच फुलोरा येतो. फुलोऱ्याचा दांडा तळाशी १५ सेंमी. जाड असून ६ १० मी. उंच असतो. फुलोऱ्यातील लहान कंदिकांपासून तसेच मूलक्षोडापासून येणाऱ्या अधश्चरांपासून नवीन वनस्पती तयार होतात. यापासून मोठ्या प्रमाणावर रोपांची निर्मिती होत असते. अशा पद्धतीने जैवीक कुंपण करून पिकांचे संरक्षण करता येते.





## जागतिक दिवस: हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

७८६ : हरुन अल रशिद बगदादचा खलिफा झाला.
१८९३ : सरदार खाजवीवाले, श्री. गणपतराव घोटवडेकर व भाऊ रंगारी यांनी पुण्यात पहिल्यांदा सार्वजनिक गणपती बसवले. लोकमान्य टिळकांनी हा उपक्रम उचलून धरून त्याला राष्ट्रीय उत्सवाचे स्वरुप दिले. हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरूवात होय.
१९१७ : रशियाने स्वत:ला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४८ : दोन तासांच्या चकमकीनंतर भारतीय सैन्याने दौलताबादचा किल्ला जिंकून घेतला. देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर सुमारे साडे सहाशे वर्षांनी स्वतंत्र झालेल्या किल्ल्यात भारतमातेचे मंदिर उभारण्यात आले.
१९४९ : हिंदी हि भारताची राष्ट्रभाषा म्हणून घोषित करून हिंदी दिन साजरा केला.
१९५९ : सोव्हियेत संघाचे लुना २ हे अंतरिक्षयान चंद्रावर कोसळले. चंद्रापर्यंत पोचणारी ही पहिली मानवनिर्मित वस्तू होती.
१९६० : ऑर्गनायझेशन ऑफ द पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कन्ट्रीज' ची स्थापना झाली.
१९७८ : 'व्हेनेरा-२' हे रशियाचे अंतराळयान शुक्राकडे झेपावले.
१९९५ : संगीतकार दत्ता डावजेकर यांना महाराष्ट्र सरकारचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९९ : किरिबाटी, नौरू व टोंगा या राष्ट्रांचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
२००० : मायक्रोसॉफ्ट कंपनी ने विंडोज एमई रिलीज केले.
२००३ : इस्टोनियाच्या जनतेने जनमत चाचणीत युरोपीय संघात सामील होण्यासाठीचा कौल दिला.
२०१५ : गुरुत्वीय लहरी गुरुत्वीय लहरींचे पहिले निरीक्षण करण्यात आले.
२०१७ : पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान शिंजो आबे यांनी आज संयुक्तपणे भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पाची पायाभरणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१३ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ जुलै १७८१)
१७७४ : भारतातील वे१४ राज्यपाल जनरल लॉर्ड विलियम बेंटीक यांचा जन्म. (मृत्यू: १७ जून १८३९)
१८६७ : विष्णू नरसिंह जोग वारकरी शिक्षणसंस्थेचे संस्थापक, कीर्तनकार, प्रवचनकार आणि लेखक (मृत्यू: ५ फेब्रुवारी १९२०)
१८९७ : पार्श्वनाथ आळतेकर नट, दिग्दर्शक व नाट्यशिक्षक (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९५७)
१८९८ : महाराष्ट्रीयन मराठी नाट्य-चित्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते, नाट्यसंस्था स्थापक पार्श्वनाथ आळतेकर यांचा जन्मदिन.
१९०१ : यमुनाबाई हिर्लेकर शिक्षणतज्ञ व विचारवंत (मृत्यू:)
१९१४ : भारतीय हिंदी चित्रपत सृष्टीतील सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता आणि दिग्दर्शक जी. पी. सिप्पी यांचा जन्मदिन.
१९२१ : दर्शनसिंहजी महाराज शिख संतकवी, 'मंजील-ए-नूर' आणि 'मता-ए-नूर' या ऊर्दू कवितासंग्रहांबद्दल त्यांना ऊद्रू अकादमीचे पुरस्कार मिळाले. (मृत्यू: ३० मे १९८९)
१९२३ : राम जेठमलानी केन्द्रीय कायदामंत्री, कायदेपंडीत, प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कायदेपंडित तसचं, माजी भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष आणि सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष
१९३२ : डॉ. काशिनाथ घाणेकर मराठी रंगभूमी आणि चित्रपटातील अभिनेते (मृत्यू: २ मार्च १९८६)
१९४८ : वीणा सहस्रबुद्धे प्रख्यात भारतीय ग्वाल्हेर व जयपूर येथील किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील गायक व संगीतकार
१९५७ : केपलर वेसेल्स दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेटखेळाडू
१९६३ : रविंद्र रामनारायण ऊर्फ 'रॉबिन' सिंग अष्टपैलू क्रिकेटपटू व प्रशिक्षक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८९१ : पोप स्टीफन (पाचवा) (जन्म: )
१९०१ : अमेरिकेचे वे२५ राष्ट्राध्यक्ष विल्यम मॅकिन्ले यांचे निधन. (जन्म: २९ जानेवारी १८४३)
१९७१ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित भारतीय बंगाली भाषिक कादंबरीकार, लेखक व साहित्यकार ताराशंकर बंद्योपाध्याय यांचे निधन.
१९७९ : नूर मोहम्मद तराकी अफगणिस्तानचे तिसरे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ जुलै १९१७)
१९८५ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध संगीतकार रामकृष्ण शिंदे यांचे निधन.
१९८९ : बेन्जामिन पिअरी पाल आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय कृषी संशोधक, पद्मश्री (१९५८), पद्मभूषण (१९६८), इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चरल रिसर्च () चे पहिले संचालक, तांबेरा रोगाला दाद न देणार्या व अधिक उत्पादन देणार्या गव्हाच्या जाती त्यांनी शोधून काढल्या. (जन्म: २६ मे १९०६)
१९९८ : प्रा. राम जोशी शिक्षणतज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म:)
२०११ : हरिश्चंद्र बिराजदार कुस्तीगीर व प्रशिक्षक (जन्म: ५ जून १९५०) ध्यानचंद पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीगीर व प्रशिक्षक
२०१५ : सबवे चे सहसंस्थापक फ्रेड डेलुका यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९४७)

# उपोषणकर्ते महादेव गायकवाड यांचा जीव वाचवा-नितीन सोनवणे

बीड । प्रतिनिधी

शहरामध्ये नगर परिषदेच्या समोर दिनांक ०९/०९/२०२४ रोजी पासून महादेव शामराव गायकवाड हे आमरण उपोषण करत आहेत आज ४ दिवस झाले तरीसुद्धा कुठल्याही शासकीय अधिकाऱ्याने येऊन त्यांचं आंदोलन सोडलेलं नाही. आज ऑल इंडिया पँथर सेनेच्या सर्व टीमला सोबत घेऊन नगरपरिषद या ठिकाणी आमरण उपोषणाला बसलेले आंदोलन करते त्यांची भेट घेऊन संघटनेच्या माध्यमातून त्यांना पाठिंबा दिला व सीओ निता अंधारे मॅडम यांना फोन केला असता त्यांचा मोबाईल स्विच ऑफ आहे..



आंदोलनकर्त्यांचे वडील शामराव मारुती गायकवाड यांनी द्वारकादास मंत्री बँकेकडून ४०००० रुपये कर्ज घेतले होते ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या उत्पादन व इतर रकमेतून ७५५३० रुपये नगर परिषदेने २००३ साली ला कपात करून घेतले पण वसुली अधिकारी मोरे यांच्या सांगण्यावरून तब्बल पाच वर्ष द्वारकादास मंत्री बँकेला पाठवले नाही त्यामुळे आज ३०७००० रुपये बाकी राहिली म्हणून त्यांचे खाते होल्ड केले आहे त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे या बँकेस व नगरपरिषदेला विचारणा केली असता उडवाउडचे उत्तर देत असून ही बाब गंभीर आहे त्यामुळे त्यांनी हे आमरण उपोषण केले आहे जोपर्यंत नगरपालिका व बँक या बाबतीत काही ठोस निर्णय घेत नाही तोपर्यंत उपोषण चालू राहील असं उपोषणकर्त्यांनी सांगितलं आहे.

आंदोलनाच्या काळात त्यांच्या जीवदास काही धोका झाल्यास नगरपरिषद प्रशासन जबाबदार राहील. ऑल इंडिया पँथर सेनेच्या वतीने सीओनिता अंधारे यांना विनंती करत आहोत तात्काळ लेखी स्वरूपाचं लेटर देऊन आंदोलन थांबवा व आंदोलन कर्त्याचा जीव वाचवा अन्यथा पँथरच्या वतीने व आंदोलनकर्त्यांना सोबत घेऊन नीता अंधारे यांच्या तोंडाला काळे फासले जाईल. असा इशारा नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पँथर सेना, तालुकाध्यक्ष कावेरी जाधव, तालुका उपाध्यक्ष निसार शेख, युवा शहराध्यक्ष अविनाश वाडमारे, उमेश तारीख सोशल मी शहराध्यक्ष, मिश्रीलाल जंगडा शहर सचिव, सोनी जंगडा सचिव शहर, दीक्षा मीरपगार शहर उपाध्यक्ष, पापा भाई तालुका सचिव, रोहित सोनवणे व इतर कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## टेंबे गणेश मंडळ विश्वस्त अध्यक्षपदी अनंत शास्त्री जोशी

माजलगाव। प्रतिनिधी

१२३ वर्षाची परंपरा असणाऱ्या व महाराष्ट्रभर आगळी वेगळी ओळख असणाऱ्या टेंबे गणेश मंडळ विश्वस्त च्या अध्यक्षपदी अनंत शास्त्री जोशी यांची निवड झाली असल्याची माहिती आज गुरुवारी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे.

टेंबे गणेश मंडळ कार्यालयामध्ये आज आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले यावेळी पत्रकार परिषदेमध्ये बोलतात अनंत शास्त्री जोशी यांनी सांगितले १२३ वर्षापासून आजतागायत मंडळाने परंपरा व सर्व रीतिरिवाज याची जपवणूक केलेली आहे यासोबतच सामाजिक बांधिलकी देखील जोपासण्याचे काम या मंडळाचे सदस्य अविरतपणे करत आहेत. मंडळाच्या कामकाजाची पारदर्शकता असावी या उद्देशाने विश्वस्त स्थापन करण्यात आले आहे अशी माहिती अँड, बी. आर. डक यांनी दिली आहे. टेंबे गणपतीची स्थापना दि.१४ शनिवारी होणार असून विसर्जन मिरवणूक दि. १८ बुधवारी होणार आहे.

असे आहे विश्वस्त मंडळ : अनंत शास्त्री जोशी अध्यक्ष ,विश्वनाथ जोशी उपाध्यक्ष ,गणेश मुळे सचिव ,कल्याण कुलकर्णी सहसचिव, यशवंत जोशी कोषाध्यक्ष, अँड. बी. आर .डक, चैतन्य जोशी, अनिल मुळी, जगदीश जोशी ,अभय होके



पाटील, रवींद्र कानडे सचिन बजाज सुमित रुद्रवार, संतोष जोशी ,अमित जोशी राहुल देशमुख ,सुनील रत्नपारखी ,उदय जोशी, वैभव जोशी ,शिवाजी देशमुख, पंकज रत्नपारखी यांचा समावेश आहे,अशी माहिती पत्रकार परिषदेमध्ये देण्यात आली आहे.



माजलगाव :- गृहरक्षक दलाचे जवान बाबासाहेब गुलाबराव कुल्थे यांची प्लांटून कमांडर पदी पदोन्नती,अपर पोलिस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक सचिन पाडकर यांनी केल्यानंतर कुलथे यांचा सत्कार करताना भाई गंगाभिषन थावरे,उमेश मोगरेकर,तुकाराम येवले,संजय धरपडे मुन्नाभाई राठोड यांनी शुभेच्छा दिल्या.

## खा.शरदचंद्र पवारांचे सोशल इंजिनिअरींग माजलगाव मतदार संघात देणार ओबीसी उमेदवार

धारूर । प्रतिनिधी

राजकारणातील चाणक्य म्हणून देशभरात ओळख असलेले खा.शरदचंद्र पवार हे सोशल इंजिनीअरींग करण्यात माहीर आहेत.लोकसभेला आपल्या पक्षाला सर्वात कमी जागा घेऊन सर्वात जास्त टक्केवारीने पास होण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे.महाराष्ट्रातील महा विकास आघाडी चा प्रयोग ही खा.शरदचंद्र पवार यांचाच आहे हे सर्व देशाला माहीत आहे.आगामी विधान सभा निवडणूकीत महा विकास आघाडीत बिघाडी होऊ नये म्हणून खा.शरदचंद्र पवार हे स्वत: च्या पक्षाकडून कमी जागा लढवतील व जास्त जागा निवडून आनतील हे मात्र नक्की.

बीड जिल्ह्यातील राजकारण हे ओबीसींच्या भोवती फिरते.माजलगाव मतदार संघ हा ओबीसी बहूल मतदार संघ





आहे.ओबीसी ला सोडून येथे कोणताही पक्ष राजकारण करू शकत नाही.सध्या ओबीसींची आक्रमकता पाहता येत्या विधानसभा निवडणूकीत तर माजलगाव मतदार संघाचा आमदार ओबीसींचाच होईल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. राजकीय वातावरण बदलाचा अंदाज घेण्यात खा.शरदचंद्र पवार हे वस्ताद आहेत.म्हणून या वेळी माजलगाव मतदार संघात ओबीसी चेहराच उमेदवार द्यावा लागेल या मतांपर्यंत खा.शरदचंद्र पवार हे आलेले आहेत अशी माहीती अधिकृत सुत्रांकडून मिळालेली आहे.सर्वांना सोबत घेऊन चालणारा हा सर्व समावेशक सौम्य ओबीसी चेहरा कोण याची चाचपणी चालू आहे.लवकरच हा चेहरा समोर येऊन खा.शरदचंद्र पवार हे आपल्या पक्षाचा उमेदवार जाहीर करतील.एकंदर या वेळी माजलगाव मतदार संघाचा आमदार ओबीसीच असेल असे चित्र निर्माण झालेले आहे.

खा.शरदचंद्र पवार यांच्यावर निष्ठा ठेवून बीड जिल्हा परिषदे मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी पदावर सेवा करून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेऊन समाजकारण व सक्रीय राजकारण करणारे उच्च शिक्षित व स्वच्छ प्रतीमेच्या प्रा.ईश्वर मुंडे यांचे नाव आघाडीवर आहे.

## क्रीडा विभागाच्या वतीने आवरगाव येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा



धारुर । प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचनालय पुणे यांच्या वतीने शासकीय शालेय तालुका स्तरावरील कबड्डी क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन धारूर तालुक्यातील आदर्श आवरगाव या ठिकाणी करण्यात आले होते या कबड्डी स्पर्धेत १४.१७.१९ वर्ष वयोगटातील मुला मुलींचे एकून ४३ संघ सहभागी झाले होते.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे यांच्या अंतर्गत शासकीय शालेय तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा २०२४ २५ चे आयोजन दिनांक १२ सप्टेंबर रोजी धारूर तालुक्यातील आवरगाव या ठिकाणी कबड्डी स्पर्धा आयोजित केल्या होत्या स्पर्धेत. या कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून धारूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे कार्यक्रमाचे अध्यक्ष आवरगावचे आदर्श सरपंच अमोल जगताप ,ज्येष्ठ पत्रकार अनिलजी महाजन, यांच्यासह पंचक्रोशीतून सर्व सरपंच नागरिक यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री लहूकुमार गव्हाणे सर तालुका क्रीडा संयोजक यांनी केले तर सूत्रसंचलन मुंजाराम निरडे सर यांनी केले तर पंच म्हणून काळे सर,शिनगारे राम सर,चव्हाण सर ,वैरागे ,मनोज गव्हाणे, साळुंखे ,मुंडे , समुद्रे ,गायकवाड,राऊत सर,यांनी विशेष परिश्रम घेतले.१४ वर्ष मुलांच्या गटात प्रथम जिजामाता विद्यालय तेलगाव,१४ वर्ष मुलींच्या गटात नाथकृपा माध्यमिक विद्यालय कासारी बोडखा, १७ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम न्यू हायस्कूल कारी, १७ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम वसुंधरा माध्यमिक विद्यालय कोळपिंपरी, १९ वर्षीय मुलांच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर,व १९ वर्षीय मुलींच्या गटात प्रथम राजमाता जिजाऊ महाविद्यालय धारूर या गटांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे त्याबद्दल त्यांचे मातृभूमी सार्वजनिक गणेश मंडळ व आदर्श ग्रामपंचायत आवरगाव यांच्या वतीने प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन अभिनंदन केले

# धारुरमध्ये ईद मिलादून्नबीची मिरवणूक १९ सप्टेंबरला, गणेश उत्सवामुळे मुस्लिम समाजाचा निर्णय

धारुर। प्रतिनिधी

दि.१६ सप्टेंबर रोजी देशभर ईद ए मिलादुन्नबी साजरी होत आहे. परंतू गणेश उत्सव सुरु असल्यामुळे दि.१६ रोजी ईद ए मिलाद निमित्त निघणारी ध्वज मिरवणूक दि.१९ गुरुवारी काढण्याचा निर्णय धारुर येथील ईद मिलाद सिरत कमिटीच्या वतीने घेण्यात आला.

इस्लामचे शेवटचे प्रेषीत महंमद पैगंबर (स) यांची जयंती जगभर उत्साहात साजरी होते. प्रतिवर्षी धारुर शहरातही मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रम घेवून ईद ए मिलाद साजरी केली जाते. यंदा दि.१६ सप्टेंबर रोजी देशभर पैगंबर (स) जयंती साजरी होत आहे. परंतू सध्या गणेश उत्सव सुरु असून दि.१६ व १७ सप्टेंबर रोजी धारुर शहरात गणेश विसर्जन केले जाते. यामुळे जयंती निमित्त निघणारी ध्वज



मिरवणूक दोनदिवसानंतर दि.१९ गुरुवार रोजी काढण्याचा निर्णय पोलिस प्रशासनाच्या विनंतीवरुन ईद ए मिलाद सिरत कमिटीच्या वतीने घेण्यात आला. याशिवाय ईद ए मिलाद निमित्त दि.१५ रविवारी रक्तदान शिबिर व दि.१८ बुधवार रोजी शांतता रलीचे आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीही पैगंबर (स) जयंती गणेश विसर्जनादिवशी आल्यामुळे धारुरमध्ये एक दिवसानंतर ईद साजरी करण्याचा निर्णय सिरत कमिटीने घेतला होता. ध्वज मिरवणूकीबाबत आयोजित बैठकीत बीडचे जिल्हा पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी ईद ए मिलाद सिरत कमिटीचे प्रमुख माजी नगरसेवक सय्यद हारुण यांच्याशी दुरध्वनीवरुन संवाद साधत निर्णयाचे स्वागत केले. या बैठकीत सहाय्यक पोलिस निरिक्षक डि.बी. वाघमोडे, धारुर नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष आवेज कुरेशी, माजी नगरसेवक शेख बाबुभाई, ईद ए मिलाद कमिटीचे अध्यक्ष माजी नगरसेवक शेख फसियोद्दीन, ज्येष्ठ पत्रकार सय्यद शाकेर, निवृत्त सुभेदार हाजी सय्यद ईस्माइल उपस्थित होते.



## जय हिंद गणेश मंडळाची आरती डॉ मोटे यांच्या हस्ते

चौसाळा । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध असलेले जय हिंद गणेश मंडळाच्या श्री गणेशाची आरती चौसाळ्याचे वयद्यकीय अधिकारी डॉ वैभव मोटे यांच्या हस्ते करण्यात आली तिथी वर्षा प्रमाणे सदर जय हिंद गणेश मंडळाचे हे आपल्या मंडळाच्या वतीने समाज प्रभोधक असे कार्यकरतात या मंडळाच्या वतीने उद्या दिनांक १४/९/२४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा या राष्ट्रीय कार्याला ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आव्हान जय हिंद गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले आहे

## तरविंदरसिंह मारवाहवर तत्काळ कारवाई करा - गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्षनेते सन्माननीय खासदार राहुलजी गांधी यांच्या दिल्ली येथील घरासमोर काल भारतीय जनता पक्षाचे नेते तथा माजी आमदार तरविंदरसिंह मरवाह यांनी जाहीरपणे ''राहुल गांधी बाज आजा, नही तो तेरा भी वही हाल होगा, जो तेरी दादी का हुवा'' अश्या स्वरूपाची जिवे मारण्याची



धमकी दिली असुन अशा प्रकारे कोणत्याही व्यक्तीला जिवे मारण्याची धमकी देणे हा गंभीर गुन्हा असुन राहुल गांधी तर या देशाचे विरोधी पक्षनेते असुन घटनात्मक पदावर आहेत. तरी देखील अद्याप पर्यंत तरविंदरसिंह मारवाह याच्यावर कसल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही याउलट यादेशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र भाई मोदी व गृहमंत्री अमित भाई शाह यावर कुठलेही भाष्य नकरता तरविंदरसिंह मारवाह याला पाठीशी घालण्याचे काम करत आहेत. यासर्व प्रकरणाचा बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करत त्याच्यावर तत्काळ कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/५९५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०९/०८/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) मच्छिंद्र अंकुशराव झरेकर रा. शिरनेर ता. अंबड जि. जालना सव्हे नं.८२/१/१ प्लॉट नं. १६७ न.प.मि.नं.१८-१७०-१६७/२ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१७०-१६७/१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला नुतन वसाहत ठाकुर नगर अंबड येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-कॉलनी अंतर्गत रोड
पश्चिम :प्लॉट नं. १९४
दक्षिण-प्लॉट नं. १६८
उत्तर रस्ता : प्लॉट नं. १६७ चा भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/६३२
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २८/०८/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) ओकार पांडुरंक बहिरे रा. अंबड ता. अंबड जि. जालना सव्हे नं.११सहान प्लॉट नं. ७ सि.स.नं.१८७१/ब/७ न.प.मि.नं.१८-१४९-७/१ चे हस्तांतरण करणे बाबत

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१४९-७/१ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-याच प्लॉट मधील भाग
पश्चिम :ओपन स्पेस
दक्षिण-०९ मिटर रुदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर रस्ता : सर्व्हे नं. ११ मधील जमीन

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन मा. के.सी. बागल, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट नं. ८, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ फौजदारी अर्ज ७१५/२०२३**

अर्जदार - कल्पना पि देवीसिंग ठाकूर उर्फ कल्पना हिरासिंग चंदेल ठाकूर वय ५४ वर्षे धंदा घरकाम रा. सह्याद्री हॉटेलच्या मागे, शिवाजीनगर बीड

विरुध्द

गैरअर्जदार :- जन्म मृत्यु निबंधक, नगर परिषद कार्यालय, बीड ता.जि.बीड.

मागणी अर्ज:- रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्ट १९६९ अन्वये मृत्युची नोंद घेण्याबाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात अर्जदार यांचे वडील मयत देवीसिंग प्रतासिंग ठाकूर (गहरवार) यांच्या मृत्युची नोंद नगर परिषद बीड. ता.जि. बीड च्या जन्म मृत्यु रजिस्टरला घेण्याबाबत व मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी देवीसिंग प्रतासिंग ठाकूर (गहरवार) यांचा मृत्यु दिनांक ०९.०४.१९८२ रोजी राहते घरी कटकटपुरा बीड ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदारास मयत नामे देवीसिंग प्रतासिंग ठाकूर (गहरवार) यांचे मृत्यु प्रमाणपत्राची शासकीय, निमशासकीय व इतर कार्यालयीन कामकरीता आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास मयत नामे देवीसिंग प्रतासिंग ठाकूर (गहरवार) यांच्या मृत्युची नोंद नगर परिषद बीड, येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिनयाचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत देवीसिंग प्रतासिंग ठाकूर (गहरवार) मृत्युची नोंद नगर परिषद बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल, याची नोंद घ्यावी. आज दिनांक १२.०९.२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढीत तारीख ०१.१०.२०२४

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
**सहायक अधिक्षक,**
मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय
बीड



जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १३३७/२०२४**

**ॲड. एन. पी. वाघमारे यांचे मार्फत**

**सुरेश व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी, गणपतराव धोंडीराम येडके, हे दिनांक १८/०७/२०२४ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी, १. सुरेश पि. गणपतराव येडके, वय ४८ वर्षे, धंदा नौकरी, रा. शहंशाहनगर, बीड, ता. जि. बीड, २. संगिता भ्र. शहाजी मांजरे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. चंपावती नगर, बीड, ता. जि. बीड, ३. कल्पना भ्र. दिनकरराव काळे, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सात्रापोत्रा, ता. जि. बीड, ४. लता भ्र. मुगाजी चांदणे, वय ४५, धंदा घरकाम, रा. शाहु नगर, पोस्टमन कॉलनी, बीड, ता. जि.बीड, ५. अंजली भ्र. रमेश येडके, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. शहंशाहनगर, बीड, ता. जि. बीड, ६. शुभम पि. रमेश येडके, वय २५ वर्षे, धंदा-शिक्षण. रा. सदर, ७. रेवती पि. रमेश येडके, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर ८. अनुष्का पि. रमेश येडके, वय १५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर, अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ४ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. तसेच अर्जदार क्र. ५ ही मयताच्या मोठ्या मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन असुन अर्जदार क्र. ६ ते ८ हे मयताचे नात व नातु आहेत. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहु मयत नामे गणपतराव धोंडीराम येडके, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख १८/१०/२०२४ ही आहे. आज दिनांक १२.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय, क. स्तर, बीड

शिक्का

आदेशावरुन
स्वाक्षरित
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

# क्रेझी हॉपर्स ग्रुपने साकारले छत्रपती शिवराय

## चित्तथरारक कलाकृतीने डोळ्यांचे फेडले पारणे; धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवास परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद






परळी । प्रतिनिधी

ना धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने परळी वैद्यनाथ शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात आग्रा येथील इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुपने चित्त थरारक कलाकृतींच्या माध्यमातून छत्रपती शिवरायांचा राज दरबार साकारला. लहान मुलांपासून तरुणांपर्यंत अशा ४० कलाकारांच्या चिमूणे शिवतांडव गणेश पूजन असे डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या कलाकृती साकारल्या.

### मराठी तारका हिंदवी पाटील, प्राजक्ता गायकवाड यांचीही हजेरी

धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली व ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या गणेश महोत्सवास परळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. गुरुवारी सायंकाळी संपन्न झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात क्रेझी होपर्स ग्रुपच्या कलाकृतीसह मराठी तारका हिंदवी पाटील, प्राजक्ता गायकवाड यांनीही हजेरी लावत महाराष्ट्राची लोकधारा प्रस्तुत केली.तत्पूर्वी परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते श्रींची आरती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अखेरीस नाथ प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आलेल्या सर्व कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

## तालुकास्तरीय पिक स्पर्धेत उपेंद्र नाईकवाडे तृतीय



**चौसाळा । प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या खरीप हंगाम २०२३ – २४ च्या तालुका स्तरीय पीक स्पर्धेत सोयाबीन या पिकाचे विक्रमी उत्पादन घेतल्या बद्दल चौसाळा येथील प्रगतशील युवा शेतकरी उपेंद्र चंद्रसेन नाईकवाडे यांचा बीड तालुक्यात तृतीय क्रमांक आला असून त्यांनी सोयाबीनचे हेक्टरी २६ क्विंटल उत्पादन घेतले आहे. त्यांनी सोयाबीनचे के. डी. एस. – ७२६ या वाणाची पेरणी केली होती.

सदरील पुरस्कार उपेंद्र चंद्रसेन नाईकवाडे यांना चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात कृषिपर्यवेक्षक श्री काशीद, कृषी सहाय्यक सुनील बहिरवाळ, उपसरपंच अंकुश कळासे, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चौसाळा च्या स्थानिक नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष विठ्ठल शिंदे यांच्या ◀◀ पान ३ वर

# बेकायदेशीरपणे झाड तोडल्यास ५० हजार दंड!

## राज्यपालांनी कायद्यातील सुधारणेचा अध्यादेश लागू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शासनाची परवानगी न घेता झाड तोडण्याचा विचार करत असाल तर तो सोडून द्या. कारण राज्यपालांनी याबाबतच्या कायद्यात सुधारणा करणारा अध्यादेश लागू केला आहे. त्यानुसार बेकायदेशीरपणे झाड तोडणाऱ्याला एक हजार रुपये नव्हे तर तब्बल ५० हजार रुपये दंड करण्याची तरतूद झाली आहे. झाडे तोडण्याबाबत अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करणारी तरतूद लागू झाली आहे. त्यानुसार पूर्वी ग्रामीण भागात बेकायदेशीर वृक्षतोड झाल्यास कमाल एक हजार रुपये दंड करण्याची तरतूद होती. त्यामध्ये गेल्या ६० वर्षांत कोणतीही सुधारणा करण्यात आली नव्हती. पर्यावरण रक्षण



करण्यासाठी अशा बेकायदा वृक्षतोडीला चाप बसवणे गरजेचे होते.

नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दंडाची रक्कम ५० हजार रुपयांपर्यंत वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. राज्यपालांनी याबाबतच्या कायद्यातील सुधारणेचा अध्यादेश जारी केला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबतच्या अधिनियमात सुधारणा झाली असली तरी हा कायदा महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती या क्षेत्राला लागू नाही जाळणे, कापणे, छाटणे म्हणजेच झाड तोडणे!

दंडाची रक्कम वाढवण्याबरोबरच कोणती कृती झाड तोडणे या व्याख्येत बसते हेही स्पष्ट केले आहे. त्यानुसार झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळणे, कापणे, छाटणे, बुंध्याभोवतीची साल कोरणे किंवा झाडाची साल काढणे हे झाडाला उपद्रव देणारे प्रकार झाड तोडण्याच्या व्याख्येमध्ये समाविष्ट केले आहेत. वृक्ष अधिकारी चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर दंड करेल, असेही अध्यादेशात म्हटले आहे.

## जय हिंद गणेश मंडळाची आरती डॉ.मोटे यांच्या हस्ते



**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील प्रसिद्ध असलेले जय हिंद गणेश मंडळाच्या श्री गणेशाची आरती चौसाळ्याचे वयद्यकीय अधिकारी डॉ वैभव मोटे यांच्या हस्ते करण्यात आली

तिथी वर्षा प्रमाणे सदर जय हिंद गणेश मंडळाचे हे आपल्या मंडळाच्या वतीने समाज प्रभोधक असे कार्यकरतात या मंडळाच्या वतीने उद्या दिनांक १४/९/२४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा या राष्ट्रीय कार्याला ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आव्हान जय हिंद गणेश मंडळाच्या कार्यकर्त्याच्या वतीने करण्यात आले आहे

# शहराच्या स्वच्छतेच्या प्रश्नावर माजी मंत्री क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

## सहा दिवसापासून बीड शहरातील स्वच्छता मोहीम सुरू

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यांपासून बीड नगर पालिकेच्या स्वच्छता विभागाचे स्वच्छतेचे टेंडर मुदत संपल्यामुळे बंद झाले होते. त्यामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला होता अनेक ठिकाणी कचर्याचे ढिगारे साचले होते तर नाल्या तुंबल्या होत्या. घाणीच्या साम्राज्यामुळे नागरिक ही वैतागले होते नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याशी चर्चा करून स्वच्छता विभागाचे काम तातडीने सुरू करण्यात यावे आणि नवीन टेंडर प्रक्रिया करून स्वच्छता मोहीम आखावी अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार गेल्या सहा दिवसापूर्वी बीड शहरातील स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे.

बीड शहराच्या स्वच्छता विभागाचे टेंडर तेरा मेरा इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या एजन्सीला देण्यात आले होते. जुलै २०२४ ला टेंडरची मुदत संपल्यामुळे स्वच्छतेचे काम थांबले होते. शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नावर अनेक नागरिकांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन या प्रश्न लक्ष घालण्याची मागणी केली होती त्यानुसार माजी मंत्री क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याशी चर्चा करून आहे. त्या एजन्सीला मुदतवाढ देऊन नवीन टेंडर प्रक्रिया काढून हे काम सुरू करण्यात यावे अशा सूचना केल्या होत्या याच महिन्यात गणेशोत्सव नवरात्र महोत्सव आणि दसरा दिवाळी सण असल्यामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागणे महत्त्वाचे होते आता हे काम सुरू करण्यात आले असून अनेक भागातील स्वच्छतेचे काम सुरू झाले आहे.

## व्यसनाच्या आहारी न जाता सृदृढ जिवन जगा-ह.भ.प.भंडारे



**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सरपंच दत्तात्रय खोटे यांच्या वाढदिवसानिमित्त युवा कीर्तनकार संग्राम बापू भंडारे आले असता त्यांनी सांगितले की अलिकडच्या काळात तरूण मोठ्या प्रमाणावर व्यसनाच्या आहारी जात असल्याने शारिरीक व्याधीसह तरूण वयातच आयुष्य गमवून बसत आहेत.त्यामुळे व्यसनाच्या आहारी न जाता सृदृढ जिवन जगून समाजात सामाजिक सलोखा राखला जावा यासाठी सर्वानी गुण्यागोंविदाने राहायला हवे असे प्रतिपादन हभप.संग्राम (बापू) भंडारे यानी केले.आष्टी तालुक्यातील सांगवी(पाटण) येथील लोकनियुक्त सरपंच दत्तात्रय (आबा) खोटे याच्या अभीष्टचिंतन सोहळ्याचे गूरूवारी आयोजन ◀◀ पान ३ वर



माजलगाव :– गृहरक्षक दलाचे जवान श्री, बाबासाहेब गुलाबराव कुल्थे यांची प्लांटून कमांडर पदी पदोन्नती,अपर पोलिस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक सचिन पाडकर यांनी केल्यानंतर कुलथे यांचा सत्कार करताना भाई गंगाभिषन थावरे,उमेश मोगरेकर,तुकाराम येवले,संजय धरपडे मुन्नाभाई राठोड यांनी शुभेच्छा दिल्या.

# मनसेची बीड विधानसभा मतदारसंघाची बैठक

## बीड तालुका व शहर कार्यकारणीच्या नियुक्त्या जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाने मनसे नेते दिलीप धोत्रे, सरचिटणीस संतोष नागरगोजे,बीड जिल्हा निरीक्षक सलीम शेख, नरेंद्र तांबोळी यांच्या सूचनेनुसार मनसेचे बीड जिल्हाध्यक्ष सुमंत धस,श्रीराम बादाडे, राजेंद्र मोटे, महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड विधानसभा क्षेत्रातील मनसेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये मनसेच्या बीड शहर व तालुक्यातील नियुत्या नियुक्तीपत्र देऊन जाहीर करण्यात आल्या.



बीड शहर संघटक पदी अमरजान आजम खान पठाण,बीड तालुका सचिव पदी ज्ञानेश कुलकर्णी,बीड तालुका उपाध्यक्षपदी स्वराज मस्के पाटील,बीड शहर उपाध्यक्षपदी विजय शिंदे,आदर्श तरकसे,बीड शहर सचिव पदी कार्तिक झव्हेरी,धानोरा रोड विभाग अध्यक्षपदी विशाल होके यांची निवड जिल्हा अध्यक्ष सुमंत धस यांनी नियुक्तीपत्र देऊन केली.

विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने बीड विधानसभा मतदारसंघात मोर्चे बांधलेला सुरुवात केली असून रिक्त पदांवरती पदाधिकारी नेमणूक सुरू केली आहे. बीड विधानसभा मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा व महिलांच्या सुरक्षेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा या प्रमुख विषयावर बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आले.मनसेच्या बीड विधानसभेतील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीस जिल्हाध्यक्ष सुमंत धस,राजेंद्र मोटे, ◀◀ पान ३ वर

# शासनाने निवासी आश्रम शाळांना शंभर टक्के अनुदान देण्याची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शासनाने राज्यातील अनुसुचित जातीच्या शाहू, फुले, आंबेडकर निवासी आश्रम शाळांना तपासणीस पात्र असलेल्या १६५, शाळांना शंभर टक्के अनुदान व शिक्षक कर्मचाऱ्यांना शंभर टक्के वेतन श्रेणी द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांच्या कडे लहू महादेव बनसोडे, अनु जाती आश्रम शाळा संघर्ष समितीचे अध्यक्ष यांनी केली आहे.

गेल्या हिवाळी अधिवेशन दिनांक १५.१२.२०२३ वार शुक्रवारच्या अधिवेशनात एक महिन्यात अनुदान देण्याचे



आश्वासनाची पूर्तता तात्काळ करून द्यावी. त्यांनी काढलेल्या पत्रकाद्वारे ही मागणी केली आहे सदर पत्रक सादर करण्यात येते की श्री लहू महादेव बनसोडे हे अनु जाती आश्रम शाळा संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्ष असून हे स्नेहंकित व जवळचे कार्यकर्ते आहेत ते सतत अनुदान मागणी करत असून राज्यात २००२

पासून २८८ अनुजातीच्या शाहू फुले आंबेडकर निवासी आश्रम शाळा पैकी तपासणीस पात्र असलेल्या व ८ मार्च २०१९ अनुदान मंजूर असलेल्या १६५ आश्रम शाळा यांच्या फक्त प्रत्येक वेळी तपासण्या केल्या जातात तरी आज पर्यंत एक रुपयाही अनुदान मिळालेले नाही या शाळांमध्ये ४० ते ४५००० हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत यांना सोयी

सुविधा पुरविण्यात सर्व संस्था चालक बरबाद झालेले आहेत. यामध्ये माननीय आमदार विक्रमजी काळे साहेब सर्व आमदार शिक्षक पदवीधर यांनी अधिवेशनात प्रश्न आजपर्यंत मांडले व प्रत्येक वेळी फक्त आश्वासन व तपासण्यात झालेल्या आहेत व आता माननीय आमदार विक्रमजी काळे साहेब यांच्यासह बऱ्याच आमदारांनी या १६५

आश्रम शाळांना शंभर टक्के अनुदान व वेतनश्रेणी एका महिन्यात देण्याचे व आपले संबंधित माननीय नामदार श्री गुलाबराव पाटील साहेब यांनी आपल्या वतीने शाळांना १००% अनुदान व १००% वेतन श्रेणी एक महिन्यात देण्याचे मान्य केले होते, परंतु जवळ जवळ दोन महिने होऊनही आतापर्यंत एक रुपयाच्या अनुदान नाही व चर्चा ही नाही आम्हाला सन २००२ पासून अनुदान व वेतनश्रेणी पासून वंचित ठेवले आहे तरी मा. मुख्य मंत्री ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शनिवार दि.१४ सप्टेंबर २०२४ । पान ७

# पिंपरीतील अजित पवारांच्या माजी नगरसेवकाला गोळीबार प्रकरणात अटक

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या माजी नगरसेवकास पिंपरी चिंचवड पोलिसांनी अटक केली आहे. विनोद नढे असं त्यांचं नाव असून त्यांच्या परवानाधारक बंदुकीतून चुलत भावाने भिंतीवर गोळी झाडली आहे. याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विनोद नढे यांच्यावर निष्काळजीपणाचा आणि सचिन नढे वरती जीवितास धोका निर्माण केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.



नढे कुटुंबातील काका-पुतणे एका हॉटेलमध्ये पार्टी करत बसले होते. त्यावेळी एका काकांनी विनोद यांना फोन करून बोलावून घेतले. गणपती आरती करण्यासाठी मंडळाच्या भेटी घेत असतानाचं विनोद काकांच्या भेटीसाठी आले. त्यावेळी तू काळजी घेत जा, पुण्यात माजी नगरसेवकाची नुकतीच हत्या झाली. याची आठवण विनोद यांना करून देण्यात आली. तेव्हा विनोद यांनी कंबरेला हात लावत मी आता बंदूक घेऊन फिरतो. तीच बंदूक सचिन ने पाहण्यासाठी घेतली आणि चेष्टेचेष्टेत भिंतीवर गोळी झाडली. गुरुवारच्या रात्री नऊच्या सुमारास ही घटना घडली आहे. या प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी विनोद नढेसह सचिनला बेड्या ठोकल्या आहेत. सचिन हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पिंपरी-चिंचवडमध्ये मध्यरात्री हवेत गोळीबार (झळारिळ उहळलहुरव उीळाश)केल्याची घटना घडली होती. काळेवाडी येथील नडेनगरमध्ये ही घटना घडली होती. या गोळीबार प्रकरणी विनोद नढेसह सचिनला वाकड पोलिसांनी अटक केली आहे. काळेवाडीमधील नडेनगरमध्ये गोळीबाराची घटना घडली होती. गोळीबाराच्या आवाजाने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं होतं. हा गोळीबार नेमका कोणावर करण्यात आला, का केला असे प्रश्न निर्माण झाले होते. पण याप्रकरणी वाकड पोलिसांनी माजी नगरसेवक विनोद नढे आणि सचिन नढे यांना अटक केली आहे. तर या घटनेबाबत माहिती देताना पोलीसांनी सांगितलं की, सचिन नढे, विनोद नढे, तुकाराम नढे, माऊली नढे हे काळेवाडी पेट्रोल पंपासमोर असेलल्या राहुल बार अँड खुशबू हॉटेलमध्ये बसले होते. हॉटेलचे मॅनेजरला फटाक्यासारखा मोठा आवाज आला. त्यांनी जाऊन पाहिले असता सचिन नढेच्या हातामध्ये लोखंडी रिव्हॉल्वर होते. त्याने लोखंडी रिव्हॉल्वरने जेवणाच्या प्लेट ठेवण्याच्या पत्र्याच्या सर्विस टेबलवर फायर केला. गोळीबार झाल्यानंतर हॉटेल मधील ग्राहक घाबरून पळून गेले. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. विनोद नढे हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी नगरसेवक आहेत.

## वालचंद संचेती यांना 'महात्मा फुले ज्ञानरत्न पुरस्कार' प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अतुलनीय कार्य केल्याबद्दल कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती यांना पुणे कॅन्टोन्मेंट पुस्तक पतपेढीतर्फे 'महात्मा फुले ज्ञानरत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

'कॅम्प एज्युकेशन सोसायटी' या शैक्षणिक संस्थेमध्ये सुमारे ५१ वर्षे ते कार्यरत आहेत. 'पूना मर्चंट चेंबर्स' या व्यापारी संस्थेमध्ये त्यांनी सतत ६० वर्षे अविरत कार्य केले आहे. त्यांच्या कालावधीमध्ये दोन्ही संस्थेची झपाट्याने प्रगती झालेली आहे. तसेच इतर सामाजिक उपक्रमांमध्ये संचेती यांचा मोलाचा वाटा असतो. पदमश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते 'महात्मा फुले ज्ञानरत्न पुरस्कार' देऊन संचेती यांचा सन्मान करण्यात आले आहे. तसेच कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या विलु पुनावाला इंग्रजी माध्यम शाळेस 'आदर्श शाळा पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमास पदमश्री गिरीश प्रभुणे, माजी राज्यमंत्री श्री. बाळासाहेब शिवरकर,आदी.

# गणेशोत्सवात डीजे नको पारंपरिक वाद्य वाजवा - अजित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा करताना समाजभान राखले पाहिजे, डीजे वापरामुळे, गुलाल उधळल्यामुळे विपरीत परिणाम होत आहेत. प्रदूषणात वाढ होत असताना पर्यावरण पूरक उत्सव साजरा करा, पारंपारिक वाद्यांना प्राधान्य द्या, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.



३६ व्या पुणे फेस्टिव्हलचे उद्घाटन शुक्रवारी(ता.१३) गणेश कला क्रीडा मंच येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, सुनेत्रा पवार, काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील, आमदार रवींद्र धंगेकर, माजी राज्यमंत्री रमेश बागवे, महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले, ज्येष्ठ नेते उल्हास पवार, पी.ए.इनामदार, कृष्णकुमार गोयल, महाराष्ट्र पर्यटन विभागाच्या पर्यटन संचलनालयाच्या सहसंचालक शमा पवार, सतीश देसाई, सुरेश कलमाडी आदी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस, पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी.डी. पाटील यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. दीपक शिकारपूर, 'सरहद' संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय नहार आणि पर्यटनस्थळ बनलेल्या मोराची चिंचोली येथील जय मल्हार कृषी पर्यटन केंद्राचे देवराम गोर्डे यांना 'पुणे फेस्टिव्हल पुरस्कार प्रदान करण्यात आला. पॅरा ऑलंपिकमध्ये गोळा फेकमध्ये रौप्य पदक पटकाविणारा सचिन खिलारे याचाही यावेळी सम्मान करण्यात आला.

अजित पवार म्हणाले, ''राज्यभरात गणेशोत्सव साजरे करण्याचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी ठरावीक भागात गणेशोत्सव होत होता. पण आता मुंबईतील लाल बागचा राजा असो किंवा पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती येथे २४ तास दर्शनासाठी रांगा आहेत, सेलिब्रेटी येत आहेत. समाजातील सर्वजण मनभेद, मतभेद विसरून सर्व जन गणेशोत्सवात सहभागी होतात. माजी खासदार सुरेश कलमाडी यांनी पुणे फेस्टिवल जागतात पातळीवर पोचविला, त्यातून सांस्कृतिक चळवळीला बळ दिले, क्रीडा क्षेत्रासाठी योगदान दिले, पुण्याच्या विकासाला गती दिली हे कोणी विसरणार नाही. पुणे फेस्टिवलचे ३६वे वर्ष सुरु झाले आता पूर्वीसारखे सेलिब्रिटी येत नाहीत. ते हजेरी लावण्यासाठी वर्षानुवर्षे लाखो रुपये घेत होते. पण आता पुणे फेस्टिवलला पूर्वीप्रमाणे वैभवाचे दिवस आणावे लागतील. यासाठी पर्यटन विभाग, राज्य सरकार, पुणे महापालिका यासह इतरजण यामध्ये सहकार्य करतील.

# जिल्ह्यातील ६३ शिक्षकांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

**पौड । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, लोकशाही आघाडी आणि शिक्षिका संघाच्यावतीने जिल्ह्यातील ६३ शिक्षकांना जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाले आहेत. रविवारी (ता. १५) सासवड (ता. पुरंदर) येथील आचार्य अत्रे सभागृहात या पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष वसंतराव ताकवले, टीडीएफचे अध्यक्ष मुरलीधर मांजरे व शिक्षिका संघाच्या अध्यक्षा स्वाती उपार यांनी दिली.

पुरस्कारप्राप्त शिक्षकांची तालुकानिहाय नावे पुढीलप्रमाणे- मुळशी- अनिल काळभोर (पौड), संतोष चांदणे (माले), दीपाली विधाते (पिरंगुट), शीला पठाण (बावधन). जुन्नर- संजय वाघ (अंबोली), हनीफ शेख (आळेफाटा), धोंडिभाऊ मानकर (निमगिरी), धीरजकुमार सोनवणे (ओतूर), वनिता ढवळे (नारायणगाव). आंबेगाव- अनिल काळे (घोडेगाव), कैलास देशमुख (जांभोरी), ज्योती दहितुले (गावडेवाडी), दत्तात्रेय पाटील (शिंगवे), प्रकाश चौधरी (लोणी). दौंड- बाळासाहेब मिसाळ (वासुंदे), बाळासाहेब सरतापे (स्वामी चिंचोली), रावसाहेब डोंबे (बोरी), गणेश लोणकर (गोपाळवाडी), पूनम शेलार (राहू), बारामती- दीपक देशमुख (शिवनगर), अविनाश घोरपडे (बारामती), शुभांगी सस्ते (उंडवडी क.प.), धनजंय गायकवाड (सोमेश्वरनगर), सुदाम गायकवाड (बारामती), खेड- अशोक नगरकर (कन्हेरसर), विष्णू काळे (खरपुडी बुद्रूक), अतुल पवार (आळंदी देवाची), पोपट कामठे (वेताळ), अर्चना खोसे (राजगुरुनगर). मावळ- रमेश फडतरे (शिरगाव), मनोजकुमार क्षीरसागर (जवण), संतोष भोसले (उर्से), अनुसया दातीर (राजेवाडी भिवड), बळिराम भंडारे (वारू). शिरूर- रोहीदास मांजरे (वडनेर खुर्द), दीपाली गावडे (शिक्रापूर), कैलास पुंडे (सणसवाडी), तुषार रूके (शिक्रापूर), प्रकाश चव्हाण (कान्हूर मेसाई). भोर- रवींद्र पवार (रावडी), चारुशीला निकम (कारी), रवींद्र कुंभार (खानापूर), ज्ञानदेव उकांडे (महुडे), मारुती भोरडे (वरवे). इंदापूर- भगवान वायसे (भवानीनगर), अशोक जाधव (पळसदेव), लहू निंबाळकर (बावडा), लक्ष्मण हरणावळ (गोखळी), सुवर्णा कांबळे (शेळगाव). पुरंदर- इस्माईल सय्यद (सासवड), जालिंदर पाटे (दौंडज), संजय भिंताडे (काळदरी), शिवाजी कदम (गुळुंचे), रमेश जाधव (पिंपळे), अबोली भोंगळे (यादववाडी). वेल्हे- संजय पगारे (वांगणी), शंकर कामठे (दापोडे), दीपक सोंडकर (सोंडे), वैशाली गायकवाड (आंबवणे). हवेली- सूर्यकांत शिंदे (उरुळी कांचन), राहुल कदम (वाघोली), ऊर्मिला चव्हाण (मांजरी बुद्रुक), ज्ञानदेव वाघमोडे (वाघोली).

# राज्यात आमचेच सरकार येणार! लोकसभेत जे झाले ते विधानसभेत दिसणार नाही-सुनील तटकरेंचा विश्वास

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा पुढील २५ वर्षांच्या विकासावर 'महाराष्ट्र व्हिजन' हा विशेष कार्यक्रम पुणे श्रमिक पत्रकार आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये प्रत्येक पक्षाचे प्रदेशाध्यक्षांना निमंत्रित करण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपले व्हिजन मांडले.



पुणे श्रमिक पत्रकारसंघातर्फे 'महाराष्ट्र व्हिजन' हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रत्येक पक्षाचे प्रदेशाध्यक्षांना यावेळी बोलावण्यात येत आहे. यावेळी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे साहेबांना बोलावण्यात आले होते. त्यांनी महाराष्ट्राच्या भविष्याच्या दृष्टीने पुढील २५ वर्षांचा विचार करता कोणते निर्णय घ्यायला हवेत, नेमकी दिशा काय असावी, याचा सर्वंकष आढावा मांडला. लोकसभा २०२४ च्या निवडणुकीत जे झाले ते चित्र विधानसभेत दिसणार नाही. विरोधकांनी खोटा नॅरेटिव्ह सेट करीत लोकसभेत थोड्या अधिक जागा जिंकल्या. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीत राज्यातील समस्यांचा पगडा अधिक प्रमाणात विरोधकांना झाला. तसेच, भावनिक कार्डचा फायदा घेत महाविकास आघाडीने अधिक जागा जिंकल्या. अशाच प्रकारचा फायदा शरद पवार गटाला झाला. परंतु, विधानसभेच्या निवडणुकीत असे होणार नाही. सुनील तटकरे यांनी आपले व्हिजन मांडले.

# विद्यार्थ्यांच्या उपोषणाला आक्रमक वळण 'सारथी'च्या इमारतीचे काम बंद

**पुणे । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) २०२२ या वर्षातील विद्यार्थ्यांना १०० टक्के अधिछात्रवृत्ती देण्यात येणार आहे, त्याप्रमाणे छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील (सारथी) विद्यार्थ्यांना १०० टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात यावा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी 'सारथी'च्या पुणे कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे. परंतु, सारथी कार्यालयाकडून कोणताही दखल घेतली न गेल्याने आक्रमक झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी सारथीच्या नव्याने उभारण्यात येणाऱ्या कार्यालयाचे काम बंद पाडले.



'सारथी'च्या इमारतीत नव्याने उभारलेल्या छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन सुरू ठेवले. यादरम्यान महाविकास आघाडी पुणे शहर, संभाजी ब्रिगेड, तसेच मराठा क्रांती मोर्चा समन्वयक सेवक यांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. पुण्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, अहिल्यानगर, अमरावती अशा ठिकाणाहून संशोधक विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले आहेत.सारथीच्या विद्यार्थ्यांना नोंदणी केलेल्या तारखेपासून १०० टक्के अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सारथी कृती समितीने दिला आहे.

# पुणे विद्यापीठाच्या 'पेट परीक्षे'चा निकाल जाहीर

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा २०२४ (पेट) निकाल जाहीर झाला आहे. विद्यार्थ्यांच्या लॉगिनमध्ये निकाल उपलब्ध करून देण्यात आला आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर आणि नाशिकच्या एकूण १८ केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात आली.

ही परीक्षा ४० विषयांसाठी घेण्यात आली असून, दोन हजार ७६१ विद्यार्थी पीएच. डी. प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. एकूण जवळपास दहा हजार ७०० परीक्षार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज केले होते. त्यापैकी नऊ हजार १२८ परीक्षार्थ्यांनी उपस्थित राहून ही परीक्षा दिली होती. प्रवेश परीक्षा सुरळीतपणे पार पडल्यावर पेट परीक्षेचा निकाल नुकताच घोषित केल्याची माहिती शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी दिली. विद्यार्थ्यांनी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन निकाल डाऊनलोड करून घ्यावा, असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

# आरक्षणाबाबत वादग्रस्त वक्तव्या प्रकरणी राहुल गांधी यांच्या विरुद्ध भाजपचे आंदोलन

पुणे : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आरक्षणाबाबतच्या वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाकडून शुक्रवारी आंदोलन करण्यात आले. गांधी यांनी आपल्या वक्तव्याप्रकरणी माफी मागावी, अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली.




राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी आंदोलन करण्यात आले. आरक्षण आमच्या हक्काचे, नाही काँग्रेसच्या बापाचे' असे फलक हातात घेऊन पक्षाच्या पदाधिकारी,

कार्यकर्त्यांकडून गांधी यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. यावेळी पक्षाचे अनुसूचित जाती मोर्चा प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे, वर्षा डहाळे, पुनीत जोशी, राजू शिळीमकर, राहुल भंडारे, रवी साळेगावकर, महेश पुंडे, अतुल साळवे, किरण कांबळे आदी आंदोलनात सहभागी झाले होते.

पाटील म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपला ४०० पेक्षा जास्त जागा मिळाल्यास ते आरक्षण रद्द करतील, असा गैरप्रचार त्यांनी केल्याने काही ठिकाणी प्रभावी ठरल्याने त्यांना यश मिळाले. आता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबत वादग्रस्त वक्तव्य केले आहे, त्यातून त्यांचा खोटेपणा पुढे आला आहे. गांधी यांनी देशाची व देशातील दलित समाजाची माफी मागावी, त्याशिवाय भाजप स्वस्थ बसणार नाही.' मराठा व ओबीसी आरक्षणाबाबतही त्यांची दुटप्पी भूमिका राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी खोटा नॅरेटीव्ह निर्माण करण्यात हुशार आहेत. महाराष्ट्रातही मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबत त्यांची भूमिका दुटप्पी आहे. आरक्षणाबाबत शरद पवार, उद्धव ठाकरे आणि नाना पटोले यांनी आपली स्पष्ट भूमिका जाहीर करावी. महाराष्ट्रातील जनता त्यांच्या अशा दुटप्पी भूमिकेची शहानिशा केल्याशिवाय राहणार नाही, अशी टीकाही पाटील यांनी केली.

# सोनसाखळी हिसकावणाऱ्या दोघांना बेड्या; परराज्यातील वॉन्टेड आरोपीचा समावेश

**पुणे । प्रतिनिधी**

मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलांना टार्गेट करून सोनसाखळी हिसकावणाऱ्या दोघांना कोथरूड पोलिसांनी सापळा रचून अटक केली. दोघांकडून चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. यातील एक आरोपी हा परराज्यात वॉन्टेड असून त्याच्यावर विविध प्रकारचे पंधरा गंभीर गुन्हे दाखल आहेत. राकेश गोकुळ राठोड (वय २१, रा. जळगाव), आदित्य कुंडलिक माझिरे (वय १९, रा. मुळशी, पुणे) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. यातील राठोड रेकार्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर जबरी चोरी, घरफोडी, दरोडयासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. मध्यप्रदेशातील भारवकुवा पोलीस ठाण्यात त्याच्यावर वाहनचोरी, चैनचोरीचे गुन्हे दाखल असून त्यांच्याकडून राठोडचा शोध घेण्यात येत होता.



कोथरूडमधील उजवी भुसारी कॉलनी परिसरात मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडलेल्या वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन दोघांनी हिसकावून नेल्याची घटना नुकतीच घडली होती. त्या पार्श्वभूमीवर कोथरूड पोलिसांत वरिष्ठ निरीक्षक संदीप देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक बालाजी सानप, अंमलदार ज्ञानेश्वर मुळे, आकाश वाल्मिकी, विष्णू राठोड यांचे पथक आरोपींच्या मागावर होते.

तांत्रिक तपासावरून गुन्हा राठोड आणि माझीरे यांनी केल्याचे निष्पन्न करून पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या तपासात त्यांनी गुन्हा केल्याची कबूली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून सोन्याची चैन, मंगळसूत्र, मोबाईल, दुचाकी असा मुद्देमाल जप्त करून कोथरूड पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत. सहायक पोलीस आयुक्त सरदार पाटील, वरिष्ठ निरीक्षक संदीप देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली. शहरात पुन्हा चोरट्यांचा धुमाकूळ

पुणे शहरात पुन्हा सोन साखळी चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याचे पाहिला मिळत आहे. मोबाईल लुटीसोबतच सोन साखळी चोरटे देखील अॅक्टीव्ह झाल्याचे दिसत असून, भरधाव दुचाकीने पाठिमागून महिलांच्या गळ्यातील सोन साखळी हिसकावत आहेत. मॉर्निंग वॉकसोबतच ज्येष्ठ महिलांना टार्गेट केले जात आहेत.

# पुणे बाजार समितीच्या उपसभापतीपदी दत्तात्रय पायगुडे बिनविरोध

**पुणे । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीपदी दत्तात्रय पायगुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. शुक्रवारी (दि. १३) गुलटेकडी मार्केट यार्ड येथील बाजार समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. उपसभापती सारीका हरगुडे यांच्या पदाचा आठ महिन्यांचा कार्यकाळ संपल्याने त्यांनी सभापती दिलीप काळभोर यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला होता. (झींपश चरीज्ञशीं ऊेाळींशश)



शुक्रवारी झालेल्या बैठकीत उपसभापतींची बिनविरोध करण्यात आली. या बैठकीत उपसभापती निवडीसाठी सुचक म्हणून नितीन दांगट तर अनुमोदन अनिरूध्द भोसले यांनी केले. यावेळी, बाजार समितीचे सचिव डॉ. राजाराम धोंडकर, सभापती दिलीप काळभोर, संचालक प्रकाश जगताप, प्रशांत काळभोर यांच्यासह सर्व संचालक मंडळ उपस्थित होते. निवडणुकीसाठी अध्यासी अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप यांनी काम पाहिले.